cmyk

दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–९३ | मंगळवार दि.२३ जून २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### लग्नानंतर मुलगी परकी होते का?

भारतीय समाजात ''मुलगी लग्नानंतर परकी होते'' ही धारणा दीर्घकाळ प्रचलित आहे. विवाहानंतर मुलगी पतीच्या कुटुंबाचा भाग बनते आणि माहेराशी तिचे नाते दुय्यम ठरते, अशी समजूत अनेक ठिकाणी अजूनही आढळते. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या अलीकडील निर्णयाने या दृष्टिकोनावर पुनर्विचार करण्याची गरज अधोरेखित केली आहे.

# ५६ साखर कारखान्यांकडे ३९६ कोटी एफआरपी थकीत

## शेतकरी अडचणीत, सोलापूरातील आठ कारखान्यांकडे ८८ कोटी रुपये अडकले

पुणे । प्रतिनिधी

**राज्यातील २०२५–२६ चा साखर हंगाम संपून जवळपास चार महिन्यांचा कालावधी उलटून गेला असला तरी हजारो ऊस उत्पादक शेतकऱ्यांना अद्याप त्यांच्या घामाच्या मोबदल्याची प्रतीक्षा करावी लागत आहे. साखर कारखान्यांकडे शेतकऱ्यांच्या उसाची एफआरपी थकीत असून, राज्यभरातील ५६ साखर कारखान्यांकडे तब्बल ३९६ कोटी रुपये अडकले आहेत. यामध्ये सोलापूर जिल्ह्यातील आठ साखर कारखान्यांकडेच ८८ कोटी रुपयांहून अधिक रक्कम थकीत असल्याने ऊस उत्पादकांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त होत आहे.**



ऊस तोडणीच्या वेळी शेतकऱ्यांना लवकरात लवकर पैसे देण्याचे आश्वासन देणारे कारखानदार हंगाम संपल्यानंतर मात्र हात झटकत असल्याचा आरोप शेतकरी संघटनांकडून केला जात आहे. ऊस घालून अनेक महिने उलटून गेले तरी पैसे कधी मिळणार, याबाबत कारखान्यांचे अध्यक्ष, संचालक, अधिकारी किंवा चिटबॉयदेखील स्पष्ट माहिती देत नसल्याने शेतकरी कारखान्यांच्या पायऱ्या झिजवत असल्याचे चित्र अनेक भागांत पाहायला मिळत आहे. साखर आयुक्त कार्यालयाच्या नोंदीनुसार, मागील हंगामात गाळप केलेल्या २१० कारखान्यांपैकी १५४ कारखान्यांनी शेतकऱ्यांची संपूर्ण एफआरपी अदा केली आहे. मात्र उर्वरित ५६ कारखान्यांकडे अजूनही ३९६ कोटी रुपयांची थकबाकी आहे. त्यामुळे एफआरपी देण्याबाबतचे नियम आणि त्यांची अंमलबजावणी यावर पुन्हा एकदा प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. सोलापूर जिल्ह्यातील कारखान्यांकडे सर्वाधिक थकबाकी असल्याचे आकडेवारीतून स्पष्ट होते. सिद्धेश्वर साखर कारखान्याकडे ३० कोटी ५४ लाख रुपये, संत कुर्मदास साखर कारखान्याकडे १५ कोटी ९८ लाख रुपये, कमलाभवानी साखर कारखान्याकडे सुमारे ९ कोटी रुपये, अवताडे शुगरकडे ३ कोटी ५९ लाख रुपये, भीमा साखर कारखान्याकडे जवळपास २ कोटी रुपये, ओंकार शुगर

▶▶ पान २ वर

## थोडक्यात...

### ९७ हजार ७०६ कोटींच्या विक्रमी मागण्या सादर

मुंबई: राज्याचा सन २०२६–२७ या वर्षाचा अर्थसंकल्प सादर करून चार महिने होत नाहीत तोवर राज्य सरकारने सोमवारी विधिमंडळाच्या पावसाळी अधिवेशनाच्या पहिल्या दिवशी ९७ हजार ७०६ कोटी ४० लाख रुपयांच्या पुरवणी मागण्या सादर केल्या आहेत. पुरवणी मागण्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजनेसाठी २० हजार ५५२ कोटी रुपयांची तरतूद करण्यात आली आहे. मेट्रो प्रकल्पासह मुंबईतील विविध प्रकल्पाकरिता भरीव तरतूद करण्यात आली आहे. पुणे रिंग रोड तसेच जालनाझ्नांदेड द्रुतगती मार्गासाठी ३०० कोटींची तरतूद पुरवणी मागण्यांमध्ये करण्यात आली आहे. मुख्यमंत्री व अर्थमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सोमवारी विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहात सन २०२६–२७ या वर्षाच्या पुरवणी मागण्या सादर केल्या. या मागणीतील १३ हजार ८२५ कोटी रुपये अनिवार्य खर्चासाठी, ६६ हजार ५५९ कोटींची तरतूद कार्यक्रमांतर्गत खर्चासाठी आणि १७ हजार ३२१ कोटींची रक्कम केंद्र पुरस्कृत कार्यक्रमाच्या अंतर्गत अर्थसहाय्य म्हणून समावेश करण्यात आला आहे.

### भाजपाचे 'ऑपरेशन चिखल' – काँग्रेस

नवी दिल्ली: दुसऱ्या पक्षातील खासदार, आमदार फोडायचे, त्यांना विकत घ्यायचे आणि या सर्व प्रकाराला ऑपरेशन लोटस म्हणालचे, या भाजपच्या प्रवृत्तीबाबत काँग्रेसने हल्लाबोल केला आहे. भाजपच्या तथाकथित ऑपरेशन लोटसवर काँग्रेसचे प्रवक्ते पवन खेरा यांनी जोरदार टीका केली आहे. हे ऑपरेशन लोटस नव्हे, हे तर ऑपरेशन चिखल आहे असे ते म्हणाले. जिथे कमळ उमलू शकत नाही, तिथे भाजप चिखल पसरवत आहे, असा आरोपही त्यांनी केला. काँग्रेस नेते पवन खेरा यांनी भाजपच्या 'ऑपरेशन लोटस'वर जोरदार हल्ला चढवला आहे. त्यांनी भाजपवर खासदार विकत घेतल्याचा आरोप केला आहे. खासदार आणि आमदार विकत घेण्यासाठीच सरकार आहे का? असा सवाल खेरा यांनी केला आहे. पवन खेरा म्हणाले की, जिथे कमळ उमलले नाही, तिथे चिखल पसरवला जात आहे.

### काश्मीरी पंडितांनी भूतकाळ विसरून जावा–मुफ्ती

श्रीनगर: काश्मीरी पंडितांनी भूतकाळात त्यांच्यासोबत जे काही घडले ते विसरून गेले पाहिजे, असा सल्ला आणि आवाहन जम्मू–काश्मीरच्या माजी मुख्यमंत्री व पीपुल्स डेमोक्रेटिक पार्टीच्या (पीडीपी) प्रमुख महबूबा मुफ्ती यांनी केले. वार्षिक मेळाव्यानिमित्त माता खीर भवानी मंदिरात पूजा केल्यानंतर त्या माध्यमांशी बोलत होत्या. दरम्यान, महबूबा मुफ्ती यांच्या विधानाला भाजपने टीका केली आहे. खीर भवानी मंदिरात काश्मीरी पंडितांशी संवाद साधल्यानंतर पत्रकारांशी बोलताना पीडीपी प्रमुख म्हणाल्या की, काश्मीरी पंडितांनी खोऱ्यात एका सामायिक भविष्याच्या दिशेने काम केले पाहिजे आणि भूतकाळाच्या विळख्यातून बाहेर पडून पुढे सरकले पाहिजे.

# बंगालमध्ये महाराष्ट्राची पुनरावृत्ती !

## ममतांच्या फुटीर आमदारांचा पक्षावर दावा



कोलकाता । वृत्तसंस्था

**तृणमूल काँग्रेस मधील बंडखोर गटाने पक्षाध्यक्ष ममता बॅनर्जी यांच्याविरोधात उघड बंड पुकारले आहे. विरोधी पक्षनेते आणि उलुबेरिया पुरबाचे आमदार रितब्रत बॅनर्जी यांच्या नेतृत्वाखालील या बंडखोर गटाने सोमवारी ज्येष्ठ आमदार अरुप रॉय यांची पक्षाच्या अध्यक्षपदी निवड केली. हाच खरा तृणमूल काँग्रेस असल्याचा दावाही या गटाने केला आहे. या दाव्याने प.बंगालमध्ये महाराष्ट्राची पुनरावृत्ती झाल्याचे बोलले जात आहे.**

कोलकाता येथील न्यू टाऊनमधील एका पंचतारांकित हॉटेलमध्ये आयोजित विशेष अधिवेशनात अरुप रॉय यांच्या नियुक्तीचा निर्णय घेण्यात आला. या बैठकीला बंडखोर आमदार, नगरसेवक आणि विविध जिल्ह्यांतील माजी लोकप्रतिनिधी उपस्थित होते. पक्षांतर्गत निर्माण झालेल्या घटनात्मक संकटावर तोडगा काढण्यासाठीच ही बैठक बोलावण्यात आल्याचे बंडखोरांनी स्पष्ट केले आहे. या बैठकीला उपस्थित असलेल्या एका नेत्याने रितब्रत बॅनर्जी यांच्या हवाल्याने सांगितले की, ''पक्षाच्या संघटनात्मक रचनेचा कार्यकाळ संपल्यानंतरही त्याचे नूतनीकरण करण्यात आले नव्हते.

▶▶ पान २ वर

# अखेर ऑपरेशन टायगर यशस्वी!

## शिवसेना ठाकरे गटाच्या बंडखोर खासदारांनी केली पक्षांतराची घोषणा



मुंबई । प्रतिनिधी

गेल्या काही दिवसांपासून महाराष्ट्राच्या राजकीय वर्तुळात सुरू असलेल्या वादळी चर्चा, आरोप–प्रत्यारोप आणि नाट्यमय घडामोडींना अखेर सोमवारी पूर्णविराम मिळाला आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) गटातील सर्व ६ बंडखोर खासदारांनी अधिकृतपणे पक्षांतराची घोषणा केली आहे. वाय. बी. सेंटर येथे झालेल्या एका भव्य सोहळ्यात उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे यांच्या उपस्थितीत या सर्व खासदारांनी शिंदे गटात प्रवेश केला.

▶▶ पान २ वर

### ऑपरेशन टायगर आणि दिल्लीतील ते गुप्त मिशन

या संपूर्ण पक्षांतराची संहिता १६ जून रोजीच दिल्लीत लिहिली गेली होती. अत्यंत गोपनीय पद्धतीने पार पडलेल्या या मोहिमेचे सविस्तर तपशील आता समोर आले आहेत. १६ जून रोजी खासदार संजय जाधव, संजय देशमुख, ओमराजे निंबाळकर, भाऊसाहेब वाकचौरे, नागेश पाटील आष्टीकर आणि संजय दिना पाटील हे ६ खासदार देशाच्या विविध भागांतून अचानक दिल्लीत पोहोचले आणि त्यांनी नोएडामधील एका हॉटेलमध्ये मुक्काम केला. त्याच दिवशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि श्रीकांत शिंदे देखील दिल्लीत दाखल झाले. १७ जून (सकाळी ७:०० वा.): खासदार श्रीकांत शिंदे आणि ओमराजे निंबाळकर यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची भेट घेतली. १७ जून (सकाळी १०:२० वा.): उर्वरित ५ खासदारांनी लोकसभा अध्यक्षांची भेट घेऊन एक पत्र सुपूर्द केले. यामध्ये आपण एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत सामील होत असल्याचे सांगत सभागृहातील आसनव्यवस्था बदलण्याची अधिकृत विनंती केली. या भेटीनंतर सर्व खासदार वेगवेगळ्या विमानाने चेन्नई, वाराणसी, पुणे आणि मुंबईला रवाना झाले.

# ८ दिवसांत पाऊस महाराष्ट्र व्यापणार !

## मान्सून सक्रिय, अरबी समुद्रातील वारे बळकट



पुणे । प्रतिनिधी

अल–निनोचे अडथळे पार करत अखेर सोमवारी (२२ जून) सकाळी मान्सून पुणे शहरात दाखल झाला. यंदा तो नियोजित तारखेपेक्षा तब्बल १५ दिवस उशिरा आला. मान्सूनचा वेग पाहता आगामी ४८ तासांत तो मुंबईत पोहचेल, असा अंदाज भारतीय हवामान विभागाने दिला आहे. राज्यात पुढील आठ दिवस मुसधार पावसाचा इशारा देण्यात आला आहे.

गेले पंधरा दिवस मान्सून बारामती, हरणाई, सोलापूर भागात थबकलेला होता. मात्र, रविवारी (दि. २१) तो हवेचे दाब अनुकूल होताच सक्रिय झाला. त्यामुळे पुणे जिल्ह्यासह राज्याच्या

▶▶ पान २ वर

# दोन मिनिटांचा उशिर एका वर्षाची मेहनत पाण्यात !

## निट परीक्षार्थीचा रडतानाचा व्हिडिओ व्हायरल, यंत्रणेच्या निष्ठुरतेवर प्रश्नचिन्ह



बीड । प्रतिनिधी

नीट ही देशातील सर्वात मोठी वैद्यकीय प्रवेश परीक्षा. या परीक्षेसाठी लाखो विद्यार्थी दिवस–रात्र अभ्यास करतात. कष्टाच्या त्या एका क्षणाचे स्वप्न घेऊन ते परीक्षा केंद्रावर पोहोचतात. मात्र, एका परीक्षा केंद्रावरून आलेला एक व्हिडिओ अनेकांच्या मनाला भिडून गेला. या व्हायरल व्हिडिओमध्ये एक विद्यार्थिनी परीक्षा केंद्राच्या गेटवर उभी राहून धाय मोकलून रडताना दिसत आहे. तिचे एकच म्हणणे होते ''सर, फक्त दोन मिनिटे उशीर झाला, आत जाऊ द्या ना प्लीज...! पण या दोन मिनिटाच्या उशिरामुळे संपूर्ण वर्षाची मेहनत पाण्यात गेली.

सदर विद्यार्थिनी परीक्षा केंद्रावर अवघ्या काही मिनिटांच्या उशिराने पोहोचली होती. नियमांचे पालन करण्याच्या

▶▶ पान २ वर

### शिक्षण व्यवस्था आणि निष्ठुरतेचे दर्शन

हा व्हिडिओ केवळ एका विद्यार्थिनीच्या रडण्याचा नाही, तर तो आपल्या शिक्षण व्यवस्था आणि नोकरशाहीच्या निष्ठुरतेचे दर्शन घडवतो. नियम हे विद्यार्थ्यांसाठी असतात, विद्यार्थी नियमांसाठी नाही. परीक्षा घेणाऱ्या संस्थांनी अशा संवेदनशील घटनांची दखल घेणे आवश्यक आहे. केवळ नियमांचे पालनासाठी विद्यार्थ्यांचे भविष्य टांगणीवर लावणे म्हणजे त्यांच्या कष्टाचा अपमान आहे. जर अशा घटना वारंवार घडत राहिल्या, तर विद्यार्थ्यांचा अशा व्यवस्थांवरचा विश्वास उडून जाईल.

# कोचिंग सेंटरला आग १४ मुलांचा होरपळून मृत्यू



लखनऊ । वृत्तसंस्था

उत्तर प्रदेशची राजधानी लखनऊमधील अलीगंज भागात एक धक्कादायक घटना घडली आहे. येथील पुरनिया चौकाजवळील एका कोचिंग सेंटरला भीषण आग लागली. या भीषण दुर्घटनेत १४ मुलांचा होरपळून मृत्यू झाला आहे. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या प्रकरणाच्या उच्चस्तरीय

▶▶ पान २ वर

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.२२ जून २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: ८७.०० क्विंटल | २,१०१ | २,५०० | २,३६४ |
| ज्वारी/हायब्रिड: ६९.०० क्विंटल | २,००० | ४,०४० | २,६८७ |
| मका/लोकल: ४.०० क्विंटल | १,८१० | २,०५० | १,९३० |
| तूर : ०.५० क्विंटल | ७,३०० | ७,३०० | ७,३०० |
| उडीद : १.०० क्विंटल | ४,७०० | ४,७०० | ४,७०० |
| बाजरी: २५.०० क्विंटल | २,२५० | २,६०० | २,४५७ |
| मुग: ४.०० क्विंटल | ७,००१ | ७,००१ | ७,००१ |
| सोयाबीन:१.५० क्विंटल | ६,७०० | ६,७०० | ६,७०० |
| हरभरा: १०.५० क्विंटल | ४,३०१ | ५,४५० | ५,१०२ |

# जिल्ह्यात शाळांच्या वेळेत बदल

## आता शाळा सकाळच्या सत्रात



बीड । प्रतिनिधी

**जिल्ह्यात अल निनोचा प्रभाव आणि लांबलेल्या पावसामुळे तापमानात मोठी वाढ झाली आहे. वाढत्या उष्णतेमुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्यावर होणारा विपरीत परिणाम आणि उष्माघाताचा धोका लक्षात घेता, जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने शाळांच्या वेळेत बदल करण्याचा निर्णय घेतला आहे.**

जिल्हा परिषदेच्या शिक्षण विभागाने सोमवारी (२२ जून) यासंदर्भात अधिकृत आदेश जारी केला आहे. त्यानुसार, मंगळवार, २३ जून २०२६ पासून पुढील आदेशापर्यंत जिल्ह्यातील सर्व शाळा सकाळच्या सत्रात भरवण्यात येणार आहेत. शाळांची नवीन वेळ सकाळी ८:०० ते दुपारी १२:३० अशी निश्चित करण्यात आली आहे. वाढत्या

▶▶ पान २ वर




cmyk

## अग्रलेख

# लग्नानंतर मुलगी परकी होते का? सर्वोच्च न्यायालयाच्या निर्णयाने बदललेला दृष्टिकोन

भारतीय समाजात ''मुलगी लग्नानंतर परकी होते'' ही धारणा दीर्घकाळ प्रचलित आहे. विवाहानंतर मुलगी पतीच्या कुटुंबाचा भाग बनते आणि माहेराशी तिचे नाते दुय्यम ठरते, अशी समजूत अनेक ठिकाणी अजूनही आढळते. मात्र, सर्वोच्च न्यायालयाच्या अलीकडील निर्णयाने या दृष्टिकोनावर पुनर्विचार करण्याची गरज अधोरेखित केली आहे.

२ जून २०२६ रोजी सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या महत्त्वपूर्ण निर्णयात स्पष्ट केले की केवळ विवाह झाला म्हणून मुलगी तिच्या आई-वडिलांच्या कुटुंबाची सदस्य राहात नाही, असे मानणे घटनात्मक तत्त्वांच्या विरोधात आहे. उत्तर प्रदेशातील कुलसुम निशा यांच्या प्रकरणात न्यायमूर्ती पी. एस. नरसिंहा आणि आलोक अराधे यांच्या खंडपीठाने हा निकाल देत समानता आणि लिंगनिरपेक्ष न्यायाच्या मूल्यांना अधोरेखित केले. हे प्रकरण सार्वजनिक वितरण व्यवस्थेअंतर्गत चालणाऱ्या रेशन दुकानाच्या वारसाहक्काशी संबंधित होते. कुलसुम निशा यांच्या आईच्या निधनानंतर त्यांनी दुकान स्वतःच्या नावावर हस्तांतरित करण्याची मागणी केली. मात्र, उत्तर प्रदेश सरकारच्या २०१९ च्या आदेशानुसार ''कुटुंब'' या व्याख्येत विवाहित मुलीचा समावेश नसल्याने त्यांचा अर्ज नाकारण्यात आला. सर्वोच्च न्यायालयाने या गृहितकाला आव्हान दिले की विवाहानंतर मुलगी जन्मदात्या कुटुंबापासून वेगळी होते. न्यायालयाने विचारले की विवाहित मुलगा कुटुंबाचा सदस्य मानला जात असेल, तर विवाहित मुलीला का वगळले जाते? असा भेदभाव अनुच्छेद १४ आणि १५ मधील समानतेच्या तत्त्वांच्या विरोधात असल्याचे न्यायालयाने नमूद केले.

न्यायालयाने सामाजिक वास्तवाचाही विचार केला. आज अनेक विवाहित मुली पालकांची आर्थिक जबाबदारी सांभाळतात किंवा त्यांच्या देखभालीत महत्त्वाची भूमिका बजावतात. त्यामुळे केवळ विवाहाच्या आधारावर कुटुंबाशी असलेले नाते संपल्याचे मानणे वास्तवाशी सुसंगत नाही. हा निर्णय महिलांच्या हक्कांबाबत सर्वोच्च न्यायालयाच्या प्रगतिशील भूमिकेचा पुढचा टप्पा मानला जातो. २०२० मध्ये मुलींना हिंदू संयुक्त कुटुंबात जन्मतः समान वारसाहक्क असल्याचे स्पष्ट केल्यानंतर, न्यायालयाने विविध प्रकरणांत विवाहित मुलींना समान वागणूक देण्यावर भर दिला आहे. या निकालाचे परिणाम रेशन दुकानांपुरते मर्यादित नसून सरकारी सेवा, अनुकंपा नियुक्त्या, सामाजिक सुरक्षा योजना आणि कौटुंबिक लाभांवरही होऊ शकतात. त्यामुळे प्रशासकीय निर्णयांमध्ये वैवाहिक स्थितीऐवजी व्यक्तीची वास्तविक परिस्थिती आणि कुटुंबाशी असलेले संबंध अधिक महत्त्वाचे ठरू शकतात. तथापि, कायदेशीर बदलांपेक्षा सामाजिक मानसिकतेत बदल होण्यासाठी अधिक वेळ लागतो. अनेक कुटुंबांमध्ये आजही मुलींना वारसाहक्क आणि कौटुंबिक निर्णयांमध्ये दुय्यम स्थान दिले जाते. त्यामुळे या निर्णयाचे महत्त्व त्याच्या सामाजिक संदेशातही आहे.सर्वोच्च न्यायालयाने स्पष्ट केले आहे कि विवाह हा मुलगी आणि तिच्या जन्मदात्या कुटुंबातील नातेसंबंध संपवणारा निकष नाही. लग्नानंतरही मुलगी कुटुंबाचा भाग राहते आणि तिचे अधिकार व नाते कायम राहतात. स्त्री-पुरुष समानतेच्या दिशेने हा निर्णय एक महत्त्वपूर्ण टप्पा ठरतो.

# पवार कुटुंबियांच्या आनंदात मुंडे परिवार सहभागी

## बाळदादा पवार यांच्या चिरंजीवाच्या विवाहास ना.पंकजाताई मुंडे, डॉ.प्रीतमताई मुंडे यांची उपस्थिती

**बीड । प्रतिनिधी**

**जिल्ह्यातील गेवराईच्या बाळदादा पवार यांच्या कुटुंबियांच्या आनंदात मुंडे परिवार सहभागी झाल्याचा सुखद क्षण आज दिसून आला. राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना.पंकजाताई मुंडे व माजी खासदार डॉ.प्रितमताई मुंडे यांनी पवार यांच्या चिरंजीवांच्या विवाहास उपस्थित राहून नव दाम्पत्यास शुभाशीर्वाद दिले.**

गेवराई येथील भाजपा नेते श्री बाळदादा पवार आणि नगराध्यक्षा सौ. गीताभाभी पवार यांचे सुपुत्र चि. शिवराज आणि श्री. सुरेशराव पंडितराव यादव रा. रामपुरी, जि. परभणी यांची सुकन्या चि.सौ.कां.डॉ.जुही यांचा शुभविवाह सोहळा आज पुण्यात अत्यंत उत्साहात संपन्न झाला. या विवाह सोहळ्यास ना. पंकजाताई मुंडे व माजी खासदार डॉ. प्रितमताई मुंडे यांनी उपस्थित राहून नवदांपत्याला भेटून त्यांच्या सुखी, समृद्ध आणि दीर्घायुषी वैवाहिक जीवनासाठी मनःपूर्वक शुभेच्छा व शुभाशीर्वाद दिले. तसेच या आनंदाच्या प्रसंगी वधू-वर कुटुंबीय, नातेवाईक व उपस्थित मान्यवरांशी आपुलकीचा संवाद साधला. या मंगल प्रसंगी श्री. बाळदादा पवार, माजी आमदार श्री.लक्ष्मणराव पवार यांच्यासह पवार व यादव कुटुंबीय, गेवराईतील प्रमुख पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### केंद्रीय मंत्री मुरलीधर मोहोळ यांचेकडे सांत्वनपर भेट

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांचे वडील कै. किसनराव मोहोळ यांचे नुकतेच दुःखद निधन झाले. आज पुणे येथे ना. पंकजाताई मुंडे यांनी त्यांच्या निवासस्थानी जाऊन मोहोळ परिवाराची सांत्वनपर भेट घेतली आणि कै. किसनराव यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून भावपूर्ण श्रद्धांजली वाहिली. यावेळी मा.खा.डॉ.प्रितमताई मुंडे उपस्थित होत्या.

# मध्यरात्री सिनेस्टाईल पाठलाग; गोतस्करीचा मोठा डाव वडवणी पोलिसांनी उधळला

**वडवणी । प्रतिनिधी**

वडवणी पोलिसांनी एका सिनेस्टाईल पाठलागानंतर गोतस्करीचा मोठा डाव उधळून लावला असून, या प्रकरणात तिघांना अटक करण्यात यश मिळवले आहे. ही कारवाई १४ व १५ जूनच्या मध्यरात्री करण्यात आली.

दिनांक १४ जूनच्या रात्री ११ वाजल्यापासून ते १५ जूनच्या पहाटे ५ वाजेपर्यंत वडवणी शहरात 'ऑल आऊट ऑपरेशन' मोहिमेअंतर्गत नाकाबंदी सुरू होती. पहाटे दीड वाजण्याच्या सुमारास एक पांढऱ्या रंगाची इनोव्हा गाडी (क्रमांक -०४ -९८३५) संशयास्पद रितीने फिरताना पोलिसांना दिसली. पोलिसांनी गाडी थांबवण्याचा इशारा केला असता, चालकाने पोलिसांना कट मारून गाडी भरधाव वेगाने बीडच्या दिशेने पळवली. सपोनि वर्षा व्हगाडे यांच्या सूचनेनुसार, पुढील नाकाबंदीवरील पोलीस पथकाने जगताप पेट्रोलपंपाच्या पुलाजवळ गाडी थांबवण्याचा प्रयत्न केला. यावेळी आरोपी चालकाने पोलिसांच्या अंगावर गाडी घालून जिवे मारण्याचा प्रयत्न केला, मात्र पोलिसांनी प्रसंगावधान राखत स्वतःचा बचाव केला. त्यानंतर पोलीस उपनिरीक्षक श्याम गायकवाड




आणि पथकाने गाडीचा सिनेस्टाईल पाठलाग केला. हॉटेल प्रतिक्षाजवळ गाडीचा वेग कमी होताच पोलिसांनी ओव्हरटेक करून ती थांबवली. यावेळी अंधाराचा फायदा घेत आरोपी फरार झाले, तर गाडीची तपासणी केली असता त्यात दोन गोवंश जनावरे क्रूरतेने बांधून ठेवल्याचे आढळून आले. या प्रकरणी वडवणी पोलीस ठाण्यात जिवे मारण्याचा प्रयत्न, प्राण्यांचा छळ आणि इतर विविध कलमांखाली गुन्हा दाखल करण्यात आला. गुन्ह्याचे गांभीर्य ओळखून पोलिसांनी तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे तपास केला. आरोपी ठाणे आणि लातूर जिल्ह्यातील असल्याचे निष्पन्न झाले. २१ जून रोजी लातूर जिल्ह्यातील लामजना (ता. औसा) येथे धाड टाकून पोलिसांनी खालील तिघांना अटक केली: १. आमिर आसिफ सुर्वे (वय २६, रा. गोविंदवाडी, कल्याण) २. आमेर शब्बीर मेमन (वय ३५, रा. अन्सारी चौक, कल्याण) ३. शाहेद अन्वर बिरादार (वय ३३, रा. लामजना, ता. औसा) न्यायालयाने तिन्ही आरोपींना तीन दिवसांची पोलीस कोठडी सुनावली असून, या गुन्ह्यात आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास पोलीस करत आहेत. ही कारवाई पोलीस अधीक्षक चेतना तिडके, अप्पर पोलीस अधीक्षक ऋषीकेश शिंदे यांच्या मार्गदर्शनाखाली सपोनि वर्षा व्हगाडे, पोलीस उपनिरीक्षक श्याम गायकवाड आणि पोलीस अंमलदारांच्या पथकाने यशस्वीपणे पार पाडली.

# रागावर नियंत्रण मिळविणे शक्य-डॉ.जगदीश टेकाळे

**बीड । प्रतिनिधी**

**राग येणे ही खूप सामान्य गोट आहे. आपल्याला अनेक गोष्टींचा राग येत असतो. राग किंवा क्रोध हा माणसाचा सर्वांत मोठा शत्रू आहे. जीवनात यशस्वी व्हायचे असेल, तर रागावर नियंत्रण मिळवणे अत्यावश्यक आहे. राग हा प्रगतीमधील सर्वांत मोठा अडथळा आहे. राग आल्यावर मानवी शरिरातील हार्मोन्स अनियंत्रित होतात. राग आल्यामुळे माणसाची भावनिक स्थिती विस्कळीत होऊन त्याच्या इतर गोष्टींवर याचा वाईट परिणाम जाणवतो. त्यासाठी राग नियंत्रणात आणण्याचे उपाय जाणून घेऊया.**



अपेक्षा कमी करा :-सगळं माझ्या मनासारखंच होईल, ही कल्पना सोडली की राग आपोआप कमी होतो. सगळं माझ्या इच्छेनुसार होणार नाही, तरी ठीक आहे. ही सूचना मनाला दिली की आपोआप अपेक्षा कमी व्हायला मदत होते आणि अपेक्षा कमी केल्या की अपेक्षा भंग होण्याचे दुःख होत नाही आणि कोणाचा रागही येत नाही. श्वसनाचा सराव- राग येतोय असं जाणवलं की थांबा श्वास घ्या - मग बोला ! हे तंत्र रागावर नियंत्रण मिळवण्यासाठी प्रभावी ठरते. रागाच्या भरात आपण पटकन बोलून जातो आणि मग पश्चाताप होतो. त्याऐवजी हे तंत्र वापरले तर तुम्हाला मनावर नियंत्रण ठेवायला वेळ मिळेल. स्वतःशी संवाद : मनाविरुद्ध झालं की लगेच भावनेत वाहून न जाता, स्वतःला थोडे थांबवा. मनाला विचारा, ही गोष्ट खरंच इतकी मोठी आहे का?, यामुळे माझा अहंकार दुखावला गेला आहे की खरोखर अन्याय झाला आहे? डायरी लिहा : रोज ५ मिनिट रागाची डायरी लिहा. त्यात काय झालं? का राग आला? त्यामागे भीती, अपेक्षा की अहंकार होता? मी राग नियंत्रित करायला हवा होता का? चूक माझी होती की दुसऱ्याची? हे प्रश्न आणि त्याची स्वतःलाच दिलेली उत्तरं नोंदवून ठेवली तर तुमचं स्वतःवरचं निरीक्षण वाढेल आणि रागाला हळूहळू दूर नेईल. मेडिटेशन : दररोज फक्त १० मिनिटं डोळे बंद करून श्वासावर लक्ष केंद्रित करा. मेडिटेशनमुळे मन शांत होते. असे मत डॉ.जगदीश श्रीराम टेकाळे एम.बी.बी.एस., एम.डी.मानसोपचार तज्ज्ञ (गोल्ड मॅडॅलिस्ट)न्युरो सायकियाट्रिस्ट, व्यसनमुक्ती तज्ज्ञ, सेक्सोलॉजीस्ट यांनी व्यक्त केले. डॉ.जगदीश टेकाळे महिन्याच्या दुसऱ्या व चौथ्या रविवारी बीड शहरात साई(गावते कॉम्प्लेक्स, डी.पी.रोड,डॉक्टर लाईन,बस स्टॅण्डच्या पाठीमागे येथे उपलब्ध असतात.

# बीड शहरात मूलभूत सुविधा देण्यासाठी १५ व्या वित्त आयोगाचा निधी खर्च व्हावा

## डॉ.योगेश क्षीरसागर यांच्यासह शिष्टमंडळाची बीडच्या जिल्हाधिकाऱ्यांकडे मागणी

**बीड । प्रतिनिधी**

बीड नगरपरिषदेला १५ व्या केंद्रीय वित्त आयोगांतर्गत प्राप्त झालेल्या २० कोटी रुपयांच्या निधीचा विनियोग शहराच्या मूलभूत सुविधांच्या विकासासाठी करण्यात यावा, अशी मागणी भाजपचे युवा नेते डॉ.योगेश क्षीरसागर यांनी जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्याकडे सोमवारी (दि.२२) निवेदनाद्वारे केली. यावेळी भाजपच्या पदाधिकाऱ्यांसह कार्यकर्ते उपस्थित होते.



निवेदनात म्हटले की, नगर विकास विभागाच्या दि. २४ मार्च २०२६ च्या शासन निर्णयानुसार बीड नगरपरिषदेला १५ व्या वित्त आयोगाच्या शिफारशींनुसार २० कोटी रुपयांचा पहिला हप्ता प्राप्त झाला आहे. या निधीचा वापर शहरातील पाणीपुरवठा, स्वच्छता आणि इतर नागरी सुविधांच्या उभारणीसाठी प्राधान्याने करण्यात यावा. डॉ. क्षीरसागर यांनी नगर परिषदेच्या पाणीपुरवठा विभागाचे थकीत वीजबिल भरून अतिरिक्त वीजभार मंजूर करून घेण्याची मागणी केली. यामुळे शहराला पूर्ण दाबाने वीज उपलब्ध होऊन पाणीपुरवठा सुरळीत होण्यास मदत होईल, असे त्यांनी नमूद केले. तसेच अमृत अटल पाणीपुरवठा योजनेतील अपूर्ण कामे पूर्ण करून सध्या १५-१५ दिवसांनी मिळणारे पाणी ४ ते ५ दिवसांच्या अंतराने उपलब्ध करून देण्याची मागणीही करण्यात आली. शहरातील ज्या भागांमध्ये पाईपलाईन टाकण्यात आली आहे; मात्र पाणीपुरवठा होत नाही, अशा भागासाठी स्वतंत्र सर्वेक्षण करून झोननिहाय अंदाजपत्रके तयार करावीत, अशी सूचनाही निवेदनात करण्यात आली आहे. यासोबतच पाण्याचा पुनर्वापर, नगर परिषदेच्या इमारतींवर रेनवॉटर हार्वेस्टिंग, बिंदुसरा व करपरा नदीतील पाण्यावर प्रक्रिया करून पुनर्वापर यांसारख्या उपाययोजनांची अंमलबजावणी करण्याची मागणी करण्यात आली. घनकचरा व्यवस्थापनासाठी नगर परिषदेकडे स्वतःची जागा नसल्याने कचरा प्रक्रिया प्रकल्पासाठी स्वतंत्र डम्पिंग ग्राऊंडसाठी जमीन खरेदी करण्यात यावी, तसेच शहर स्वच्छतेसाठी ट्रॅक्टर, कॉम्पॅक्टर, घंटागाड्या आणि अग्निशमन विभागासाठी अत्याधुनिक वाहने व उपकरणे खरेदी करावीत, अशीही मागणी करण्यात आली आहे. यावेळी बीड नगरपरिषदेच्या भाजप गटनेत्या डॉ.सारिकाताई क्षीरसागर, शुभम धुत, नागेश तांबारे, राहुल गुरखुदे, सनी माने, मंगेश धोंगडे, नितीन साखरे, मुन्ना गायकवाड, विठ्ठल गुजर, मिलिंद ठोकळ, सुशील जाधव, ज्ञानेश्वर राऊत आदी उपस्थित होते.

# पान १ वरून...

### ५६ साखर कारखान्यांकडे ३९६ कोटी

(मातोश्री लक्ष्मी) कडे १ कोटी १५ लाख रुपये, जयहिंद शुगरकडे ४० लाख रुपये, तर ओंकार शुगर (व्ही.पी.) कडे ७ लाख २६ हजार रुपये थकीत आहेत. याशिवाय गोकुळ शुगरकडे तब्बल १३० कोटी रुपये अडकले असल्याची माहिती शेतकरी संघटनांकडून देण्यात येत असली तरी साखर आयुक्त कार्यालयाच्या एफआरपी तक्त्यात या थकबाकीचा उल्लेख नसल्याने संभ्रम निर्माण झाला आहे. या प्रकरणाची स्पष्टता करण्याची मागणीही शेतकरी संघटनांनी केली आहे.पश्चिम महाराष्ट्रातील सांगली जिल्ह्यातील दोन आणि सातारा जिल्ह्यातील दोन साखर कारखान्यांकडेही शेतकऱ्यांचे कोट्यवधी रुपये थकीत असल्याचे समोर आले आहे. त्यामुळे ऊस उत्पादकांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत आहे. ऊस हे दीर्घकालीन पीक मानले जाते. ऊस लागवडीपासून ते तोडणीपर्यंत शेतकऱ्यांना दीड वर्षांहून अधिक काळ मेहनत घ्यावी लागते. खत, बियाणे, पाणी, वीज, मजुरी आणि इतर कृषी खर्चासाठी मोठी गुंतवणूक करावी लागते. त्यानंतर ऊस कारखान्याला दिल्यानंतरही पाच ते सहा महिने पैसे मिळत नसल्याने शेतकऱ्यांची आर्थिक घडी विस्कळीत होत आहे.ऊसतोडणी झाल्यानंतर पुढील पिकांची मशागत, बियाणे खरेदी, कर्जफेड, मुलांचे शिक्षण आणि घरगुती खर्च यासाठी शेतकरी एफआरपीच्या पैशांवर अवलंबून असतात. मात्र पैसे वेळेवर न मिळाल्यामुळे अनेकांना खासगी सावकारांकडून किंवा बँकांकडून कर्ज घ्यावे लागत असल्याचे वास्तव आहे. शेतकरी संघटनांनी सरकारकडे एफआरपी देण्याच्या कायद्यात अधिक कठोर तरतुदी करण्याची मागणी केली आहे. कारखान्यांनी निर्धारित मुदतीत पैसे न दिल्यास दंडात्मक कारवाई, व्याजासह रक्कम वसूल करणे आणि संचालक मंडळाची जबाबदारी निश्चित करणे अशा उपाययोजनांची गरज व्यक्त केली जात आहे. दरम्यान, शेतकऱ्यांच्या घामाचे पैसे वेळेत मिळणे हा त्यांचा हक्क असून, थकीत एफआरपीची तातडीने वसुली करण्यासाठी साखर आयुक्त कार्यालय आणि राज्य सरकारने कठोर पावले उचलावीत, अशी मागणी ऊस उत्पादकांकडून जोर धरू लागली आहे. राज्यातील साखर उद्योगाच्या आर्थिक उलाढालीचे आकडे मोठे असताना शेतकऱ्यांचे पैसे मात्र महिनोनमहिने अडकून राहणे ही चिंतेची बाब असल्याची भावना ग्रामीण भागातून व्यक्त होत आहे.

------------------

### अखेर ऑपरेशन टायगर

या ऐतिहासिक फुटीमुळे ठाकरे गटाला लोकसभा निवडणुकीनंतरचा हा आतापर्यंतचा सर्वात मोठा धक्का मानला जात आहे. यामुळे ऑपरेशन टायगर अखेर यशस्वी झाले असल्याचे दिसत आहे. ठाकरे गटाचे प्रवक्ते संजय राऊत यांना अप्रत्यक्ष टोला लगावताना मुख्यमंत्री म्हणाले, आमच्याकडे आता ट्रिपल संजयची (संजय जाधव, संजय देशमुख, संजय दिना पाटील) एन्ट्री झाली आहे. आधीच संजय राठोड आमच्यासोबत आहेत. इतके संजय पाठीशी असल्यावर आता आम्हाला बाकीच्यांची गरज नाही आणि त्यांची काही गिनतीही उरलेली नाही. हा लढा बाळासाहेबांच्या आणि हिंदुत्वाच्या विचारांचा असून, सर्व खासदारांच्या मतदारसंघातील प्रश्न सोडवून कुटुंब म्हणून आपण पुढे वाटचाल करू, अशी ग्वाहीही त्यांनी दिली. या बंडखोरीची स्क्रिप्ट १६ जून रोजीच लिहिली गेल्याचे आता स्पष्ट झाले आहे. मातोश्रीवर आयोजित करण्यात आलेल्या बैठकीला हे सहाही खासदार गैरहजर राहिल्याने ऑपरेशन टायगरच्या चर्चांना उधाण आले होते. त्यावेळी खासदार संजय राऊत यांनी, सर्व खासदार व्हिडिओ कॉन्फरन्सिंग आणि फोनद्वारे संपर्कात आहेत, असा दावा करत डॅमेज कंट्रोल करण्याचा प्रयत्न केला होता. मात्र, खासदार संजय जाधव यांनी शिंदे गटाचे केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांची भेट घेतल्याने या चर्चांना अधिक बळ मिळाले. माहितीनुसार, १६ जून रोजीच या सर्व ६ खासदारांनी देशाच्या विविध भागांतून गुप्तपणे दिल्ली गाठली होती आणि नोएडामधील एका हॉटेलमध्ये मुक्काम केला होता. त्याच दिवशी मुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि खासदार श्रीकांत शिंदे हे देखील दिल्लीत दाखल झाले. १७ जून रोजी सकाळी ७ वाजता श्रीकांत शिंदे आणि ओमराजे निंबाळकर यांनी लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांची भेट घेतली. त्यानंतर सकाळी १०:२० च्या सुमारास उर्वरित पाच खासदारांनी अध्यक्षांना पत्र सुपूर्द करून, आपण एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत सामील होत असल्याचे स्पष्ट केले आणि सभागृहातील आसनव्यवस्था बदलण्याची अधिकृत विनंती केली. या भेटीनंतर सर्व खासदार चेन्नई, वाराणसी, पुणे आणि मुंबई मार्गे सोमवारी थेट पक्षप्रवेशाच्या सोहळ्यात दाखल झाले. या मोठ्या राजकीय भूकंपामुळे आगामी निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर ठाकरे गटाची चिंता वाढली असून, शिंदे गटाची ताकद दिल्लीत अधिक मजबूत झाली आहे. मातोश्रीवर आयोजित केलेल्या बैठकीसाठी खासदार गैरहजर राहिल्याने ठाकरे गटाचे मुख्य प्रवक्ते संजय राऊत यांनी डॅमेज कंट्रोल करण्याचा प्रयत्न केला होता. ''गैरहजर असलेले पाच खासदार व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे जोडले गेले आहेत, तर एक खासदार ठाकरेंसोबत फोनवर बोलत आहे,'' असा दावा राऊत यांनी केला होता. मात्र, त्याच वेळी खासदार संजय जाधव हे शिंदे गटाचे केंद्रीय मंत्री प्रतापराव जाधव यांची भेट घेताना कॅमेऱ्यात कैद झाले. हा केवळ बिगर-राजकीय सुसंवाद असल्याचा दावा खासदारांनी केला असला, तरी पक्षप्रवेशाने या दाव्यांमधील हवा काढून घेतली आहे.

----------

### बंगालमध्ये महाराष्ट्राची पुनरावृत्ती !

त्यामुळे पक्षाच्या राष्ट्रीय नेतृत्वाची पुनर्रचना करण्याची प्रक्रिया सुरू करणे आवश्यक बनले होते.'' हावडा सेंट्रलचे आमदार असलेल्या अरुप रॉय यांची आवाजी मतदानाने अध्यक्षपदी निवड करण्यात आली.या बंडखोर गटाने आपली नवी राष्ट्रीय कार्यकारिणी जाहीर केली आहे. यामध्ये अरुप रॉय, रितब्रत बॅनर्जी यांच्यासह कोलकाताचे माजी महापौर आणि एकेकाळी ममता बॅनर्जींचे खंदे समर्थक राहिलेले फिरहाद हकीम, अरुप बिस्वास, बिप्लव मित्रा, अखरुझमान अन्सारी, सबिना यास्मिन, संदिपन साहा, रथिन घोष आणि जावेद खान यांचा समावेश आहे. महाराष्ट्रामध्ये शिवसेनेमध्ये आणि राष्ट्रवादीमध्ये अशाच पद्धतीने दोन गट पडून आपणच मूळ पक्ष असल्याचा दावा केला होता. याबाबत अजूनही न्यायालयात वाद सुरू आहे. तसाच प्रकार आता बंगालमध्ये तृणमुल पक्षाच्याबाबत झाला असल्याचे दिसत आहे.

**ममता बॅनर्जींकडून मूळ स्थापना**

ममता बॅनर्जी यांनी जानेवारी १९९८ मध्ये काँग्रेसमधून बाहेर पडल्यानंतर तृणमूल काँग्रेसची स्थापना केली होती. पक्षाच्या स्थापनेपासून त्या त्याचे नेतृत्व करत आहेत. गेल्या एप्रिल महिन्यातील विधानसभा निवडणुकीत टीएमसीचा पराभव होऊन सत्ता जाण्यापूर्वी त्यांनी सलग १५ वर्षे पश्चिम बंगालचे मुख्यमंत्री म्हणून कार्यभार सांभाळला होता. विधानसभा निवडणुकीत तृणमूल काँग्रेसचा नामुष्कीजनक पराभव झाला. यानंतर पक्षात मोठी फूट पडली असल्याचे दिसत आहे.

----------

### कोचिंग सेंटरला आग १४ मुलांचा

चौकशीचे आदेश दिले असून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी मृतांच्या कुटुंबियांसाठी आर्थिक मदत जाहीर केली आहे. उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री ब्रिजेश पाठक यांनी या घटनेत किमान १४ जणांचा मृत्यू झाल्याची पुष्टी केली आहे. मृत पावलेल्यांमध्ये बहुतांश तरुण मुला-मुलींचा समावेश असल्याचे समजते, जे आग लागली तेव्हा इमारतीमध्ये उपस्थित होते. धुराच्या साम्राज्यामुळे इमारतीत नेमके किती लोक अडकले आहेत, याबाबत बराच वेळ संभ्रम होता. आग लागताच संपूर्ण इमारतीत वेगाने धूर पसरला. हे पाहून स्थानिक लोकांनी तातडीने अग्निशामक दलाशी संपर्क साधला. प्रत्यक्षदर्शींनी दिलेल्या माहितीनुसार, आगीने बघता बघता विक्राळ रूप धारण केले होते. दुर्घटना घडली तेव्हा कोचिंग सेंटरमध्ये मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. आगीच्या ज्वाळा आणि धूर पसरताना पाहून विद्यार्थ्यांमध्ये एकच पळापळ झाली. सर्वत्र किंचाळ्या आणि गोंधळाचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी लखनऊमधील या आगीच्या घटनेत झालेल्या जीवितहानीबद्दल तीव्र दुःख व्यक्त केले असून, मृतांच्या कुटुंबियांना आणि जखमींना आर्थिक मदत जाहीर केली आहे. प्रत्येक मृत व्यक्तीच्या नातेवाईकाला २ लाख रुपये, तर जखमींना ५० हजार रुपयांची आर्थिक मदत दिली जाणार आहे.

---------------

### दोन मिनिटांचा उशिर एका वर्षाची

नावाखाली तेथील कर्मचाऱ्यांनी तिला आत प्रवेश देण्यास नकार दिला. लाखो विद्यार्थ्यांचे भविष्य घडवणाऱ्या या परीक्षेची शिस्त महत्त्वाची आहे, यात दुमत नाही. परंतु, काही सेकंदांच्या किंवा मिनिटांच्या उशिरासाठी एका वर्षाची मेहनत आणि एका तरुणाईचे स्वप्न असे निर्दयपणे चिरडून टाकणे कितीपत योग्य आहे? हा प्रश्न आता उपस्थित केला जात आहे. सोशल मीडियावर वेगाने व्हायरल होत असलेल्या व्हिडिओमध्ये ही विद्यार्थिनी परीक्षा केंद्राच्या लोखंडी गेटजवळ उभी राहून हात जोडून विनवणी करताना दिसत आहे. तिच्या डोळ्यातून घळाघळा अश्रू वाहत आहेत. ''माझं अख्खं वर्ष वाया जाईल'', ''मी खूप अभ्यास केला होता'', असे म्हणत ती आत जाण्यासाठी पोलिसांची आणि कर्मचाऱ्यांची गयावया करत आहे. तिच्यासोबत असलेले पालक आणि नागरिक देखील तिला मदत करण्यासाठी मध्यस्थी करण्याचा प्रयत्न करत आहेत, पण सर्व प्रयत्न निष्फळ ठरले गेले. या घटनेनंतर सोशल मीडियावर संतप्त प्रतिक्रिया उमटत आहेत. अनेकांनी असा प्रश्न विचारला आहे की, जर परीक्षा इतकी शिस्तबद्ध आहे, तर कधीकधी पेपर लीक होण्याच्या घटना कशा घडतात? त्यावेळी यंत्रणेची शिस्त कुठे असते? केवळ दोन मिनिटांच्या उशिरामुळे एखाद्या विद्यार्थ्याचे आयुष्यभराचे स्वप्न उद्ध्वस्त करणे योग्य आहे का? परीक्षा घेणाऱ्या संस्थेने, म्हणजेच एनटीएने आणि स्थानिक प्रशासनाने अशा परिस्थितीमध्ये थोडा मानवी दृष्टिकोन दाखवणे गरजेचे होते, असे अनेकांचे मत आहे. संबंधित यंत्रणेने थोडी सहानुभूती दाखवून, अशा प्रकारच्या आकस्मिक परिस्थितीत योग्य निर्णय घेण्याची क्षमता वाढवली पाहिजे, अन्यथा यामुळे विद्यार्थ्यांचे मानसिक खच्चीकरण होण्यास वेळ लागणार नाही.

----------

# केजमध्ये चाकूने भोसकून खून, आरोपिंच्या अटकेसाठी रास्ता रोको

**केज । प्रतिनिधी**

**भांडणात मध्यस्थी करण्यासाठी गेलेल्या हॉटेल चालकाचा चाकूने भोसकून खून झाल्याची धक्कादायक घटना केज येथे घडली आहे. विलास घुले असे मृत हॉटेल चालकाचे नाव आहे. अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयात उपचारादरम्यान ही घटना घडली. या घटनेनंतर केज परिसरात तणाव निर्माण झाला असून, आरोपींना तात्काळ अटक करण्याच्या मागणीसाठी नातेवाईकांनी पोलीस ठाण्यात ठिय्या मांडला. तसेच छत्रपती शिवाजी महाराज चौकात दोन वेळा रस्ता रोको आंदोलन केल्याने काही काळ वाहतूक विस्कळीत झाली.**

या प्रकरणात नऊ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला असून, यातील तीन आरोपींना पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. दरम्यान उर्वरित आरोपींच्या अटकेच्या मागणीसाठी सोमवारी देखील बीड - केज राष्ट्रीय महामार्गावर रास्ता रोको आंदोलन करण्यात आले. घटना २० जून रोजी सायंकाळी साडेसातच्या सुमारास कदमवाडी फाट्यावरील 'हॉटेल गावकरी'समोर घडली. हॉटेल चालक विलास घुले, आकाश चाळक,





उमेश माने आणि स्वयंपाकी गणेश शुक्ला हे हॉटेलवर बसलेले असताना पांढऱ्या रंगाच्या स्कॉर्पिओमधून बाबासाहेब कदम, मंगेश कदम, रामेश्वर गायकवाड आणि त्यांचे इतर नातेवाईक तेथे आले. अनैतिक संबंधाच्या संशयावरून बाबासाहेब कदम यांनी उमेश माने याला मारहाण करण्यास सुरुवात केली. जीव वाचवण्यासाठी उमेश माने केजच्या दिशेने पळाला, त्याला वाचवण्यासाठी नितीन घुले आणि हॉटेल मालक विलास घुले हे देखील त्याच्या मागे धावले. दरम्यान, बाबासाहेब कदम, मंगेश कदम, रामेश्वर गायकवाड, शुभम गायकवाड, भैय्यासाहेब गायकवाड,अजय उर्फ बंकट कदम, नवनाथ कदम, दीपक कदम आणि संतोष कदम यांनी रेणु बारसमोरील बंद समर्थ बिअर बारजवळ नितीन आणि विलास घुले यांना अडवले. सर्वांनी मिळून विलास घुले यांना मारहाण सुरू केली. याच वेळी बाबासाहेब कदम यांनी सोबत आणलेला चाकू काढून विलास घुले यांच्या पोटात खुपसला. रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या विलास घुले यांना तात्काळ केज येथील शासकीय रुग्णालयात नेण्यात आले. तेथून पुढील उपचारासाठी त्यांना अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ ग्रामीण रुग्णालयात हलवण्यात आले; मात्र उपचारादरम्यान त्यांचा मृत्यू झाला. या प्रकरणी नऊ जणांविरुद्ध केज पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेनंतर संतप्त नातेवाईक व स्थानिकांनी केज पोलीस स्टेशनसमोर आणि छत्रपती शिवाजी महाराज चौकात ठिय्या देत आंदोलन केले. दरम्यान रस्ता रोकोमुळे काही काळ वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. तणावपूर्ण परिस्थिती लक्षात घेऊन पोलिसांनी अतिरिक्त बंदोबस्त तैनात केला आहे.

### ८ दिवसांत पाऊस

बहुतांश भागात जोरदार पाऊस झाला. सोमवारी सकाळीच मान्सून पुण्यात दाखल झाल्याची अधिकृत घोषणा हवामान विभागाने केली. तसेच, मुंबईत आगामी ४८ तासांत तो धडकणार असल्याचा अंदाज दिला. त्यामुळे आता राज्यात तो जोरदार मुसंडी मारणार आहे. मात्र, जूनची सरासरी भरून काढण्यास जुलै उजाडणार आहे. मान्सूनची रेषा पुणे, अलिबाग, तेलंगणा, कर्नाटक, छत्तीसगड, निजामाबाद, दंतेवाडा, बालंगीर, सुंदरगड, चतरा, गया, मुझफ्फर, बिहार, ओडिशा या भागातून जात आहे. लवकरच काही तासांत मुंबईसह महाराष्ट्राचा आणखी काही भाग व्यापणार आहे. अरबी समुद्रातील वारे कमकुवत होते, त्यामुळे बाष्पयुक्त वाऱ्यांचा प्रभाव क्षीण होता. तसेच, हवेचे दाब अनुकूल नव्हते. आता ते वारे बळकट झाले. हवेचे दाब अनुकूल झाल्याने मान्सून वारे सक्रिय झाले, ताशी वेग ५० ते ६० कि.मी. वेगाने अरबी समुद्रातून बाष्पयुक्त वाऱ्यांचा प्रभाव वाढला. त्यामुळे कोकण, पुणे, पश्चिम महाराष्ट्रात ढग आणि पावसाची सक्रियता वाढली. याचा परिणाम म्हणून पुणे, मुंबई, ठाणे, रायगड, पालघरमध्ये मान्सून जोरदार सक्रिय होत आहे. आता विदर्भ, मराठवाडा, उत्तर महाराष्ट्रात प्रगतीची चिन्हे दिसत आहेत, मात्र जूनमधील तूट भरून निघणे कठीण आहे, त्यासाठी जुलै उजाडावा लागणार.

--------------

### जिल्ह्यात शाळांच्या वेळेत बदल

तापमानामुळे विद्यार्थ्यांमध्ये निर्जलीकरण (डिहायड्रेशन) आणि उष्णतेशी संबंधित इतर आरोग्य समस्या निर्माण होण्याची शक्यता वर्तवण्यात आली होती. विविध शिक्षक संघटनांनी या बाबत केलेल्या मागणीची दखल घेत जिल्हा प्रशासनाने हा तातडीचा निर्णय घेतला आहे. सर्व शाळांनी या आदेशाची त्वरित अंमलबजावणी करावी आणि केलेल्या कार्यवाहीचा अहवाल शिक्षण विभागास सादर करावा, असे निर्देशही देण्यात आले आहेत.

--------------

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार, दि. २३ जून २०२६


थोडक्यात



## जागतिक संगीत दिना निमित्ताने गोल्डन येरा २०२६ संपन्न

अंबाजोगाई । प्रतिनिधी

दि २१ जून हा जागतिक संगीत दिवस असल्याने अंबाजोगाई येथे गोल्डन येरा(सदाबहार गीत) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते यामध्ये अंबाजोगाई येथील गायक गायिका यांनी सदाबहार गीते सादरीकरण अतिशय अप्रतिम केले. या मध्ये सौ मंजुषा देशपांडे, डॉ संदीप जैन,मिलिंदजी गायकवाड, श्रीधर देशपांडे, डॉ कुलदीप देशपांडे, वैष्णवी देशपांडे ,परमेश्वरजी गित्ते ,अभय जोशी यांनी आपल्या सादरीकरनातून मंत्रमूग्ध केले. संगीत रसिकांना या निमित्ताने जुन्या अवीट गाणी ऐकण्यस मिळाली. रसिकांनी यासाठी मोठ्या प्रमाणात उपस्थिती होती, त्याच बरोबर भरभरून प्रतिसाद हि दिला. हा कार्यक्रम अभय जोशी यांनी आयोजित केला.

## मातोश्री शासकीय ई.बी.सी. मुलांच्या वसतिगृह प्रवेशासाठी ३१ जुलैपर्यंत अर्ज करावेत

बीड । प्रतिनिधी

बीड येथील धानोरा रोडवरील चांदमारी परिसरात असलेल्या मातोश्री शासकीय ई.बी.सी. मुलांचे वसतिगृह येथे शैक्षणिक वर्ष २०२६-२७ साठीची प्रवेश प्रक्रिया अधिकृतपणे सुरू झाली आहे. या वसतिगृहात प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या गरजू व पात्र विद्यार्थ्यांनी आपले अर्ज वेळेत सादर करावेत, असे आवाहन वसतिगृह प्रशासनाच्या वतीने करण्यात आले आहे. माध्यमिक विभाग, उच्च माध्यमिक विभाग,महाविद्यालयीन विभाग, आय.टी.आय., आणि तंत्रनिकेतन विभागातील प्रवेश घेऊ इच्छिणाऱ्या विद्यार्थ्यांनी दि. २२ जून २०२६ ते ३१ जुलै २०२६ या कालावधीत आपले प्रवेश अर्ज सादर करायचे आहेत. सर्व शासकीय सुट्ट्यांचे दिवस वगळून, कार्यालयीन वेळेत हे अर्ज स्वीकारले जातील. विद्यार्थ्यांनी विहित नमुन्यातील अर्ज सर्व आवश्यक व योग्य कागदपत्रांसह अंतिम मुदतीच्या आत परिपूर्ण भरून कार्यालयात जमा करणे बंधनकारक आहे. ज्या विद्यार्थ्यांनी मागील शैक्षणिक वर्षात याच वसतिगृहात प्रवेश घेतला होता आणि त्यांना या वर्षी पुनर्प्रवेश हवा आहे, अशा जुन्या विद्यार्थ्यांसाठी किमान ६० टक्के गुण असणे आवश्यक आहे. ही गुणांची अट पूर्ण करणाऱ्या विद्यार्थ्यांनीच पुनर्प्रवेशासाठी अर्ज सादर करावा. असेही प्रसिद्धीपत्रकाद्वारे कळविले आहे.

## सायबर गुन्ह्यातील दोन फिर्यादीस नऊ लाख रुपये मिळवून देण्यात ॲड. किशोर खेडकर यांना यश

बीड । प्रतिनिधी

सायबर गुन्ह्यांच्या वाढत्या घटनांच्या पार्श्वभूमीवर पीडितांना न्याय मिळवून देण्यासाठी प्रभावी कायदेशीर लढा उभारणे अत्यंत महत्त्वाचे ठरत आहे. अशाच दोन सायबर गुन्ह्याच्या फिर्यादीस मा.०७वे मुख्य न्याय दंडाधिकारी न्यायालय बीड यांनी दी ११/०३/२०२६ रोजी सदरील की.फो क्र : १९६/२०२६ व दी १५/०५/२०२६ की.फो क्र ३७२/२०२६ या प्रकरणात ड. किशोर खेडकर यांनी दोन्ही फिर्यादीची बाजू सक्षमपणे मांडत न्यायालयातून नऊ लाख रुपये नुकसान भरपाई मिळवून दिली आहे.सदर प्रकरणात फिर्यादीची



ऑनलाईन फसवणूक होऊन आर्थिक नुकसान झाले होते. तपासा दरम्यान व न्यायालयीन प्रक्रियेत ड. किशोर खेडकर यांनी सखोल अभ्यास, ठोस पुरावे आणि कायद्याच्या तरतुदींचा योग्य वापर करत फिर्यादीस न्याय मिळवून देण्यासाठी प्रभावी युक्तिवाद केला. परिणामी, न्यायालयाने आरोपींकडून फिर्यादीस नऊ लाख रुपये देण्याचे आदेश दिले.या निर्णयामुळे सायबर गुन्ह्यांबाबत जनतेमध्ये जागरूकता वाढण्यास मदत होणार असून पीडितांना कायदेशीर मार्गाने दिलासा मिळू शकतो, हे अधोरेखित झाले आहे. ड. किशोर खेडकर यांच्या या यशस्वी कामगिरीबद्दल कायदेशीर क्षेत्रातून कौतुक होत आहे.

# ऊसतोड कामगारांची नोंदणी तातडीने आणि अचूकपणे पूर्ण करावी -आयुक्त दीपा मुधोळ

### जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांचे गट विकास अधिकाऱ्यांना तात्काळ कार्यवाहीचे आदेश

बीड । प्रतिनिधी

राज्यातील ऊसतोड कामगारांच्या कल्याणासाठी आणि त्यांना विविध शासकीय योजनांचे लाभ मिळवून देण्यासाठी राबवल्या जाणाऱ्या ओळखपत्र वितरण प्रक्रियेला आता गती देणे गरजेचे आहे. तरी जिल्ह्यातील ऊसतोड कामगारांची नोंदणी तातडीने आणि अचूकपणे पूर्ण करावी, असे कडक निर्देश महाराष्ट्र राज्याच्या समाज कल्याण आयुक्त दीपा मुधोळ-मुंडे यांनी दिले. जिल्हाधिकारी कार्यालयात ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षण करून त्यांना ओळखपत्र वितरीत करणेबाबत बैठक घेण्यात आली. या बैठकीस जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी जितीन रहेमान, समाज कल्याण सहायक आयुक्त प्रदीप भोगले यांची प्रमुख तर सर्व तहसीलदार व गट विकास अधिकारी यांची व्हीडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे ऑनलाईन उपस्थिती होती.

दीपा मुधोळ-मुंडे म्हणाल्या की, ऊसतोड कामगारांचे जीवन सुरक्षित आणि स्थिर करण्यासाठी ही नोंदणी अत्यंत महत्त्वाची आहे. यात कोणतीही दिरंगाई खपवून घेतली जाणार नाही. सर्व यंत्रणांनी समन्वय ठेवून हे काम मिशन मोडवर पूर्ण करावे. ऊसतोड कामगारांना अधिकृत ओळखपत्र देण्यासाठी प्रशासनाने गावपातळीवर एका विशेष समितीची स्थापना करण्यात येत आहे. यामध्ये ग्राम




महसूल अधिकारी, ग्रामसेवक, आशा कार्यकर्त्या आणि अंगणवाडी सेविका यांचा समावेश आहे.

ही समिती गावातील सर्व ऊसतोड कामगारांचे सर्वेक्षण करून त्यांची अचूक यादी तयार करेल. तयार केलेली यादी मंजुरीसाठी सहाय्यक गट विकास अधिकारी यांच्याकडे सुपूर्द केली जाईल. सहाय्यक गट विकास अधिकारी या यादीची पडताळणी करून ओळखपत्र तयार करण्यासाठी अंतिम मंजुरी देतील.

महाराष्ट्र राज्यासाठी स्मार्ट सर्विसेस प्रायव्हेट लिमिटेड, पुणे या नामांकित संस्थेकडून सर्वेक्षण करण्यात येणार आहे. या संस्थेच्या माध्यमातून आधुनिक पद्धतीने डेटा संकलित केला जाईल, जेणेकरून एकही पात्र ऊसतोड कामगार नोंदणीपासून वंचित राहणार नाही. असेही त्यांनी सांगितले. बीड जिल्हयात ऊसतोड कामगारांची संख्या मोठ्या प्रमाणात असल्याने लोकनेते गोपीनाथ मुंडे ऊसतोड कामगार कल्याण महामंडळ, पुणे या महामंडळाच्या योजनांचा जिल्ह्यातील सर्व पात्र कुटुंबांना लाभ व्हावा यासाठी संबंधितांकडे ओळखपत्र उपलब्ध असणे अत्यंत आवश्यक आहे. तरी ऊसतोड कामगारांचे सर्व्हेक्षण व त्यांची नोंदणी करुन त्यांना ओळखपत्र उपलब्ध करुन देण्याचे कामकाज युद्धपातळीवर पुर्ण करणे आवश्यक आहे. अशी सूचनाही त्यांनी यावेळी केली.

सर्व गटविकास अधिकाऱ्यांनी संबंधित संस्था स्मार्ट सर्व्हिसेस. प्रा. लि.पुणे यांच्याशी समन्वय साधून सदरचे कामकाज दि.१५ ऑगस्ट, २०२६ पर्यंत पुर्ण करणे आवश्यक आहे. त्यामुळे जिल्ह्यातील सर्व गट विकास अधिकाऱ्यांनी आपल्या कार्यक्षेत्रातील गावपातळीवरील सर्व समितीमधील ग्राम महसूल अधिकारी, ग्रामसेवक, आशा व अंगणवाडी सेविका यांची तातडीने बैठक घ्यावी. क्षेत्रीय स्तरावर काम करताना येणाऱ्या अडचणी दूर करून त्वरित प्रत्यक्ष कार्यवाही सुरू करावी. असे निर्देश जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी यावेळी दिले.

## कर्जमाफी व पिकविम्यासाठी वांगी येथे 'एक गाव अन्नत्याग' आंदोलन संपन्न

माजलगांव । प्रतिनिधी

शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे शासनाचे लक्ष वेधण्यासाठी माजलगांव तालुक्यातील वांगी बु येथे शेतकरी संघर्ष समितीच्या वतीने दि.२२ जून रोजी सोमवार रोजी सकाळी १०:०० वाजता 'एक गाव अन्नत्याग आंदोलन' सुरू करण्यात आले.या आंदोलनात परिसरातील शेतकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते.

शेतकरी संघर्ष समितीचे नेते भाई गंगाभिषण थावरे यांच्या नेतृत्वाखाली हे आंदोलन पार पडले.यावेळी शेतकऱ्यांनी कर्जमाफी व पिकविम्याच्या मागण्यांसाठी जोरदार घोषणाबाजी करत शासनाकडे तातडीने निर्णय घेण्याची मागणी केली. आंदोलनाच्या प्रमुख मागण्यांमध्ये




पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ ही सरसकट सर्व शेतकऱ्यांना लागू करण्यात यावी,मुख्यमंत्री यांनी जाहीर केल्यानुसार बीड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना प्रति हेक्टर १७ हजार ५०० रुपये पिकविमा सरसकट मंजूर करण्यात यावा,तसेच खरीप हंगाम २०२६ च्या पीकविमा योजनेत पूर्वीप्रमाणे चार ट्रिगरचा समावेश करण्यात यावा,या प्रमुख मागण्यांचा समावेश होता.दि. २२ जून सोमवार रोजी सकाळी १०:०० वाजता आंदोलनास सुरुवात झाल्यानंतर शेतकऱ्यांनी शासनाच्या धोरणांविरोधात तीव्र नाराजी व्यक्त केली.शासनाने शेतकऱ्यांच्या प्रश्नांकडे गांभीर्याने लक्ष देऊन तातडीने निर्णय घ्यावा, अशी मागणी आंदोलनकर्त्यांनी केली.यावेळी बोलताना भाई गंगाभिषण थावरे यांनी सांगितले की, राज्यातील शेतकरी सध्या आर्थिक संकटातून जात असून अवकाळी पाऊस,दुष्काळी परिस्थिती आणि उत्पादन खर्चात झालेली वाढ यामुळे शेतकरी अडचणीत सापडला आहे. त्यामुळे शासनाने तातडीने कर्जमाफी व पिकविमा संदर्भातील मागण्यांवर सकारात्मक निर्णय घेऊन शेतकऱ्यांना दिलासा द्यावा. आंदोलनात सहभागी शेतकऱ्यांनी शासनाने लवकरात लवकर मागण्या मान्य न केल्यास आगामी काळात अधिक तीव्र आंदोलन छेडण्याचा इशाराही दिला.या आंदोलनामुळे परिसरात शेतकऱ्यांच्या प्रश्नांबाबत पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली असून शासनाच्या भूमिकेकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

## पान ६ वरुन...

### गाढेवाडीच्या पाण्यावर डल्ला; अनधिकृत

आलेली नाही. त्यामुळे पाणी चोरीचे प्रकार दिवसेंदिवस वाढत असून गावातील नागरिकांना त्याचा फटका बसत आहे. या गंभीर प्रकरणाची तात्काळ चौकशी करून अनधिकृत कनेक्शन हटविण्यात यावेत तसेच गाढेवाडीचा पाणीपुरवठा नियमित व सुरळीत करण्यात यावा, अशी मागणी ग्रामस्थांनी ग्रामपंचायत प्रशासनाकडे वेळोवेळी केली आहे. मात्र अद्यापपर्यंत कोणतीही दखल घेतली जात नसून ग्रामस्थांना भिषण पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. तरी सदरील पाणी चोरी थांबवून गाढेवाडी येथील पाणी पुरवठा सुरु करा, अन्यथा ग्रामस्थांच्या वतीने तीव्र लोकशाही मार्गाने आंदोलन छेडण्यात येईल, असा इशाराही राजेंद्र गाढे, संभाजी गाढे, सोनाजी गाढे, कुंडलिक वावरे, राम देवकते, साथीराम महारगुडे आदींनी दिला असून तहसीलदार गेवराई, गटविकास अधिकारी, पंचायत समिती गेवराई तसेच सरपंच व ग्रामसेवक, ग्रामपंचायत कोळगाव यांना निवेदन देणार असल्याचे त्यांनी सांगितले.

### विधानपरिषद निवडणूकीत

ना.पंकजाताईंनी बस्वराज पाटील यांचेसह नवनिर्वाचित आमदारांचे केले अभिनंदन

बीड-धाराशिव-लातूर मतदारसंघातून निवडून आलेले बस्वराज पाटील यांच्यासह मराठवाड्यातील अमर राजूरकर, सईदखान, सुहास सिरसाठ तसेच नंदकिशोर महाजन, राजेंद्र राऊत, राजीव पोतदार, अविनाश ब्राह्मणकर, प्रवीण पोटे, धैर्यशील कदम या सर्व आमदारांचे ना. पंकजाताई मुंडे यांनी अभिनंदन करून त्यांना भविष्यातील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या आहेत.

### फूल देत दिला

पोलीस निरीक्षक वैभव पाटील यांनी सांगितले.

तर पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर यांनी म्हटले आहे की, कालच मा.सुप्रीम कोर्टाने स्पष्ट केले आहे की फुटपाथवर अधिकार केवळ पादचाऱ्यांचा, नागरिकांचा असे असतांना देखील येथे वारंवार सांगूनही अतिक्रमण का असा प्रतिप्रश्न त्यांनी माध्यमांशी बोलतांना केला. अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले की, वारंवार सूचना देऊनही अतिक्रमण करणाऱ्यांवर यापुढे समजुतीचा मार्ग अवलंबला जाणार नाही. वाहतुकीला अडथळा निर्माण करणाऱ्या अतिक्रमणधारकांविरोधात संबंधित कायद्यांनुसार कठोर कारवाई करण्यात येईल. त्यामुळे व्यापारी, हातगाडीधारक व इतरांनी स्वखुशीने अतिक्रमणे हटवून प्रशासनाला सहकार्य करावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

### आष्टीत स्मार्ट मीटरवरून

मनसेचा प्रशासनाला इशारा; धडक आंदोलन अटळ

''सरकार आणि महावितरणने जनतेच्या भावना समजून घेतल्या नाहीत, तर संपूर्ण आष्टी तालुका आंदोलनाच्या रणांगणात परिवर्तित होईल. मनसे कार्यकर्ते रस्त्यावर उतरून धडक आंदोलन करतील. त्यातून निर्माण होणाऱ्या परिस्थितीला सर्वस्वी प्रशासन जबाबदार असेल,'' असा निर्वाणीचा इशारा कैलास दरेकर यांनी दिला. स्मार्ट मीटरच्या मुद्द्यावर मनसेने घेतलेल्या या आक्रमक भूमिकेमुळे आष्टी तालुक्यातील राजकीय वातावरण तापले असून, शेतकरी व सर्वसामान्य नागरिकांकडून या भूमिकेला पाठिंबा मिळत आहे.

### डॉ. युवराज कोल्हे यांची

माजलगाव येथील यशवंत हॉस्पिटलमध्ये शल्यचिकित्सक म्हणून कार्यरत आहेत.

शिक्षणाची कोणतीही विशेष पार्श्वभूमी नसलेल्या सर्वसामान्य कुटुंबातून पुढे येत डॉ. कोल्हे यांनी आपल्या कर्तृत्वाच्या जोरावर जिल्हा शल्यचिकित्सक पदापर्यंत मजल मारली आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे माजलगावसह बीड जिल्ह्याच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला गेला असून, विविध क्षेत्रातील मान्यवर आणि नागरिकांकडून त्यांचे अभिनंदन करण्यात येत आहे.

### सुरेश धस समर्थकांचा

विधानसभा प्रमुख गणेश नाना शिंदे, भाजप तालुकाध्यक्ष रमेश गावडे, नगरसेवक व भाजपचे पदाधिकारी-कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

धस यांच्या रणनीतीची पुन्हा चर्चा

विधान परिषद निवडणुकीत बसवराज पाटील यांच्या विजयाने बीड जिल्ह्यात आमदार सुरेश धस यांच्या राजकीय रणनीतीची पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. स्थानिक स्वराज्य संस्थांमधील संपर्क, पदाधिकाऱ्यांचे समन्वय आणि कार्यकर्त्यांची एकजूट यामुळे महायुतीला मोठे यश मिळाल्याची भावना भाजप कार्यकर्त्यांमध्ये व्यक्त होत आहे.

## सेंट झेवियर्स शाळेच्या परिसरात अस्वच्छतेचे साम्राज्य; विद्यार्थ्यांच्या आरोग्याशी खेळ!

बीड । प्रतिनिधी

शहरातील नामांकित 'सेंट झेवियर्स इंग्लिश मीडियम स्कूल'च्या परिसरात पसरलेली अस्वच्छता आणि सांडपाण्यामुळे विद्यार्थ्यांच्या आरोग्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. शाळेच्या भिंतीला लागूनच वक्फ बोर्डाच्या अधिकाऱ्याने बेकायदेशीररीत्या जनावरांचा तबेला थाटल्याने विद्यार्थ्यांचे आरोग्य धोक्यात आले आहे. मिळालेल्या माहितीनुसार, वक्फ बोर्डाचे अधिकारी समीर गुलाम नबी काझी यांनी आपल्या घराचे सांडपाणी थेट शाळेच्या आवारात सोडले आहे. इतकेच नव्हे, तर पदाचा गैरवापर करून शाळेच्या कंपाऊंड वॉलला लागूनच जनावरांचा तबेला बांधला आहे. या जनावरांच्या विष्ठेमुळे परिसरात प्रचंड दुर्गंधी पसरली असून, हे ठिकाण रोगकारक जीवाणूंचे केंद्र बनले आहे.

विद्यार्थ्यांना संसर्ग, पालकांमध्ये संताप

शाळेत शिकणाऱ्या अनेक विद्यार्थ्यांना यामुळे गंभीर संसर्ग (इन्फेक्शन) होत असल्याचे प्रकार समोर आले आहेत. शेख आमेर नावाच्या पालकाने दिलेल्या तक्रारीनुसार, त्यांची मुले याच शाळेत शिकतात आणि शाळेजवळच्या या अस्वच्छतेमुळे त्यांच्या मुलींना गंभीर संसर्ग झाला आहे. केवळ त्यांचीच मुले नव्हे, तर इतर अनेक विद्यार्थीही या त्रासाला सामोरे जात आहेत.

प्रशासनाकडून कारवाईची मागणी

या प्रकाराची गंभीर दखल घेत शाळेच्या मुख्याध्यापकांनी बीड नगर परिषदेच्या मुख्याधिकाऱ्यांना पत्र लिहून तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे. शाळेच्या आवारात सांडपाणी सोडणाऱ्यांवर आणि बेकायदेशीर तबेला चालवणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी पालकांकडून जोर धरत आहे. 'स्वच्छ भारत अभियाना'चा दावा करणाऱ्या प्रशासनाकडून या गंभीर समस्येकडे दुर्लक्ष होत असल्याने, आता मोठा अनर्थ घडल्यावरच प्रशासन जागे होणार का? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.या प्रकरणाबाबत तुम्हाला आणखी काही माहिती हवी आहे का किंवा इतर काही मदत करू शकतो?

## आंतरराष्ट्रीय विधवा दिनानिमित्त २३ जून रोजी राज्यभर 'एकल महिला दिवस' साजरा करा -बाजीराव ढाकणे

बीड । प्रतिनिधी

संयुक्त राष्ट्रसंघाने घोषित केलेल्या *२३ जून 'आंतरराष्ट्रीय विधवा दिना'* च्या पार्श्वभूमीवर महाराष्ट्र शासनाच्या वतीने मंगळवार, दि. २३ जून २०२६ रोजी राज्यभर 'एकल महिला दिवस' साजरा करण्यात येणार आहे. या उपक्रमाच्या अनुषंगाने बीड जिल्हा प्रशासनाने पुढाकार घेत जिल्ह्यातील सर्व ग्रामपंचायती, नगरपंचायती, नगरपालिका व जिल्हा परिषद स्तरावर व्यापक प्रमाणात कार्यक्रमांचे आयोजन करावे, अशी मागणी साऊ एकल महिला समितीचे बीड जिल्हा समन्वयक तथा लेक लाडकी अभियानाचे श्री. बाजीराव नवनाथ ढाकणे यांनी केली आहे.



शासन स्तरावर एकल महिलांच्या सन्मान, संरक्षण, स्वावलंबन व सक्षमीकरणासाठी विविध सकारात्मक पावले उचलली जात असून, राज्याचे महिला व बालविकास विभाग एकल महिला धोरण तयार करण्याच्या प्रक्रियेत आहे. या पार्श्वभूमीवर २३ जून रोजी आयोजित होणारा 'एकल महिला दिवस' हा केवळ औपचारिक कार्यक्रम न राहता, एकल महिलांच्या समस्या जाणून घेण्याचा आणि त्यांच्या न्याय्य मागण्यांना शासनापर्यंत पोहोचविण्याचा प्रभावी उपक्रम ठरावा, असे बाजीराव ढाकणे यांनी नमूद केले.

त्यांनी पुढे सांगितले की, बीड जिल्ह्यातील प्रत्येक ग्रामपंचायत, नगरपालिका आणि संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांनी आपल्या कार्यक्षेत्रातील सर्व विधवा, परित्यक्ता, घटस्फोटित, अविवाहित, निराधार व इतर एकल महिलांना सन्मानपूर्वक निमंत्रित करून त्यांचा सत्कार करावा. तसेच त्यांच्या अडचणी, अपेक्षा आणि विविध शासकीय योजनांबाबतच्या समस्या लेखी स्वरूपात नोंदवून त्या एकत्रित करून जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्याकडे सादर करण्यात याव्यात, जेणेकरून त्या शासनापर्यंत प्रभावीपणे पोहोचू शकतील.

एकल महिलांना सामाजिक सन्मान, आर्थिक स्वावलंबन, सुरक्षितता, निवारा, आरोग्य, शिक्षण, रोजगार आणि शासकीय योजनांचा लाभ सहज उपलब्ध करून देण्यासाठी स्थानिक प्रशासनाने विशेष मोहीम राबविण्याची आवश्यकता असल्याचेही ढाकणे यांनी अधोरेखित केले. 'एकल महिला दिवस' हा एकल महिलांच्या सन्मानाचा आणि त्यांच्या हक्कांविषयी समाजात सकारात्मक जनजागृती घडवून आणण्याचा महत्त्वपूर्ण उपक्रम ठरेल, असा विश्वास व्यक्त करत श्री. बाजीराव ढाकणे यांनी बीड जिल्ह्यातील सर्व संबंधित यंत्रणांनी या उपक्रमात सक्रिय सहभाग घेऊन तो यशस्वी करावा, असे आवाहन केले आहे.

## अखेर दहा वर्षांच्या संघर्षानंतर तहसीलदारांनी शेतकऱ्यांसाठी रहदारीस शेत रस्ता करून दिला मोकळा

युसूफवडगांव । प्रतिनिधी

केज तालुक्यातील सुर्डी येथील सर्वे नंबर १८,२१ व २२ मधील १९ शेतकऱ्यांना शेतात येण्या जाण्यासाठी पुर्वापार असणारा शेत रस्ता गैर अर्जदार शेतकऱ्यांने खोडसळ भावनेने त्रास देण्याचे उद्देशाने अडवल्यामुळे त्यांना शेतात जाण्यासाठी पर्यायी रस नसल्यामुळे त्यामुळे शेती कसणे अवघड होऊन बसले होते पण काल अखेर केजचे तहसीलदार शुभम पवार यांनी स्वतः हजर राहुन पोलिस बंदोबस्तात शेतकऱ्यांना शेत रस्ता मोकळा करून दिला.

गेल्या दहा वर्षापासुन सुर्डी येथील सर्वे नं १८,२१ व २२ मधील शेतकऱ्यांना आपल्या शेतात जाण्यासाठी असलेल्या पुर्वापार शेत रस्ता अडवल्यामुळे त्यांना शेती कसण्यासाठी अनंत अडचणीचा सामना करण्याची वेळ आली रस्ता नसल्यामुळे शेतकऱ्यांना शेतातील कामे करण्यासाठी ट्रॅक्टर नेता येत नव्हते इतकेच काय तर ऊस तोडायला आल्यावर ऊस कसा घेऊन जायचा याचा सर्वात मोठा प्रश्न पडत असे कारण सर्वे नं.२१ व २२ मधील



एका खोडसळ शेतकऱ्यांने इतर शेतकऱ्यांना विनाकारण त्रास देण्याच्या बाहण्याने पुर्वापार असणारा शेत रस्ता माझ्या शेतातुन जातो असे म्हणत इतर शेतकऱ्यांना रहदारीस मज्जा केला होता.पण शासनाच्या नवीन ध्येय धोरणानुसार शेतकऱ्यांना शेतात जाण्यासाठी शेत रस्ता उपलब्ध करुन देणे बंधनकारक केल्यामुळे कित्येक शेतकऱ्यांची रस्त्याची अडचण दुर झाली.

याच शासन निर्णयानुसार रंगनाथ भिसे व १८ शेतकऱ्यांनी गेल्या काही दिवसापुर्वी तहसीलदार यांच्याकडे अर्ज करून विनंती केली की आम्हाला आमच्या शेतात जाण्यासाठी असलेला पुर्वापार शेत रस्ता रहदारीस बंद केला आहे तो खुला करून द्यावी अशी विनंती केली होतीत त्यानंतर तहसीलदार यांनी स्थळ पंचनामा करण्याचे आदेश दिले पण त्यावर गैर अर्जदार शेतकऱ्यांने वारंवार अक्षेप घेत शेतकऱ्यांना त्रास देण्यात आला या शेत रस्त्यासाठी तीन तहसीलदारांनी यांनी पाच वेळा स्थळ पंचनामा केला अखेर तहसीलदार शुभम पवार यांनी रंगनाथ भिसे व इतर १८ शेतकरी यांचा अर्ज निकाली काढत आदेश काढुन गट नं.१८,२१ व २२ मधील शेतकऱ्यांना २०,२१ व २२ सर्वे नंबर बांधावरून जाणारा पुर्वापार शेत रस्ता १० फुट रूंदीचा मोकळा करून देण्याचे आदेश काढले व त्यानुसार १९ जुन रोजी रस्ता मोकळा करण्याचे ठरले पण गैर अर्जदार शेतकरी जाणिवपूर्वक गैरहजर असल्याने दुसऱ्या दिवशी अर्थात २० जुन रोजी तहसीलदार साहेब यांनी रस्त्याचे मोजमाप करून पोलिस बंदोबस्तात शेतकऱ्यांना रस्ता मोकळा करून दिला त्यामुळे शेतकऱ्यांना शेती कसण्यासाठी आता कुठल्याही प्रकारची अडचण येणार नाही त्यामुळे शेतकऱ्यांनी तहसीलदार शुभम पवार,तलाठी इंगळे,मंडळ अधिकारी मस्के व पोलीस प्रशासनाचे आभार व्यक्त केले आहे.

# भारतीय आंब्याची यंदा ४५ देशांत निर्यात

भारतीय आंब्याने यंदाच्या हंगामात जगभरातील ग्राहकांची पसंती मिळवली असून, देशातून ४५ हून अधिक देशांमध्ये आंब्याची निर्यात झाली आहे. अमेरिकेला होणारी निर्यात गेल्या वर्षीच्या संपूर्ण हंगामातील पातळीपेक्षाही पुढे गेली असून यंदा त्यात ३० टक्क्यांहून अधिक वाढ होण्याची शक्यता असल्याची माहिती कृषी आणि प्रक्रियाकृत अन्न उत्पादन निर्यात विकास प्राधिकरणाचे (अपेडा) अध्यक्ष अभिषेक देव यांनी दिली.

अमेरिका हा जगातील सर्वांत मोठा आंबा आयातदार देश मानला जातो. यंदाच्या हंगामाचा शेवट होण्यास जवळपास एक महिना बाकी असतानाच भारतीय आंब्याची निर्यात गेल्या वर्षाच्या एकूण निर्यातीपेक्षा जास्त झाली आहे. त्यामुळे निर्यातीत लक्षणीय वाढ अपेक्षित आहे. निर्यात वाढीला चालना देण्यासाठी 'अपेडा'ने अमेरिकेतील सिएटल, लॉस एंजेलिस, वॉशिंग्टन, न्यू यॉर्क आणि अटलांटा या प्रमुख शहरांमध्ये आंबा प्रचार मोहीम राबविली आहे. याशिवाय झेक प्रजासत्ताक, मलेशिया, स्पेन, संयुक्त अरब अमिराती आणि



ओमानसह जवळपास २० देशांमध्ये आंबाविषयक प्रचार-प्रसार कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत. या व्यापक प्रचारामुळे पुढील एक ते दोन वर्षांत भारताची एकूण आंबा निर्यात दुप्पट होऊ शकते, असा विश्वास देव यांनी व्यक्त केला.भारताच्या कृषी व प्रक्रिया अन्नपदार्थ निर्यातीतही सातत्याने वाढ होत आहे. मागील आर्थिक वर्षात या निर्यातीचे मूल्य ५३ अब्ज डॉलर इतके झाले. त्यामुळे अमेरिका, ब्राझील, चीन आणि युरोपीय संघातील देशांशी स्पर्धा करत भारताने जगातील अव्वल १० कृषी निर्यातदार देशांमधील स्थान कायम राखले आहे. गेल्या दशकात भारताच्या निर्यात उत्पादनांच्या संख्येतही मोठी वाढ झाली आहे. 'अपेडा'च्या अनुसूचीत असलेल्या ७९० उत्पादनांपैकी सध्या सुमारे ५०० उत्पादनांची निर्यात होत आहे. दहा वर्षांपूर्वी ही संख्या सुमारे २८० होती. अलीकडेच रशियाने भारतीय बटाटा आणि डाळिंबासाठी बाजारपेठ खुली केली आहे. व्हिएतनामने भारतीय द्राक्षांना बाजारपेठ उपलब्ध करून दिली असून, ऑस्ट्रेलियाने भारतीय डाळिंब आयातीला मंजुरी दिली आहे. तसेच 'गल्फ फूड' आणि 'बायोफॅक' यांसारख्या आंतरराष्ट्रीय प्रदर्शनांमध्ये भारतीय निर्यातदारांना संधी देऊन निर्यातवाढीस प्रोत्साहन दिले जात आहे.

# शेळीपालनासाठी काठेवाडी शेळी ठरतेय फायदेशीर



शेतीला जोड व्यवसाय म्हणून शेतकरी वर्ग शेळीपालन करत असतो. जे की शेळीपालन करण्यास खर्च ही कमी येतो तसेच जागा ही कमी लागते. विशेष म्हणजे एका गाईला लागणाऱ्या खाद्यामध्ये जवळपास दहा शेळ्या जगवल्या जाऊ शकतात. मात्र, शेळीपालन म्हटले की अनेक प्रकारच्या शेळ्या येतात, जसे की बिटल शेळी, शिरोही, उस्मानाबादी, तोतापुरी, देशी शेळी असे अनेक प्रकार आहेत. पण तुम्ही कधी काठेवाडी शेळीबद्धल ऐकले आहे का? काठेवाडी शेळी, शेळीपालनासाठी फायदेशीर असल्यचा अनेक शेतकऱ्यांचा अनुभव आहे.

काठेवाडी शेळीची वैशिष्ट्ये : आपणास काठेवाडी जातीची शेळी जर पाळायची असेल तर ती तुम्ही आठ ते दहा वर्षाची घेऊन फायदा नाही. कारण या जातीचे निम्मे आयुष्य बंदिस्त गोठ्यामध्येच जाते. जे की तिथून पुढे जर तुम्ही ती शेळी बंदिस्त गोठ्यात ठेवली तर त्याचे आरोग्य बिघडते. कारण काठेवाडी शेळी ही दिवसाला दोन ते अडीच लिटर दुध देते. जर तुम्हाला शेळीपासून जास्त उत्पन्न पाहिजे असेल तर काठेवाडी शेळीची जात सर्वोत्कृष्ट आहे.

किती देते दूध? : काठेवाडी जातीची शेळी दिवसाला दोन ते अडीच लिटरपेक्षा जास्त दूध देते. त्यामुळे त्या दुधातून सुद्धा शेतकऱ्यांना आर्थिक फायदा होतो. तसेच शेळीपालन लोकांना वाटते की लवकर करडे मोठी व्हावीत. तसेच जास्त किमतीला विकली जावीत तर यासाठी तुम्ही काठेवाडी शेळीची जात बिनधास्तपणे निवडू शकतात.

काठेवाडी शेळी केसाळ असते : बिटल शेळी, उस्मानाबादी जातीची शेळी, शिरोही जातीची शेळी, तोतापुरी जातीची शेळी आणि देशी शेळी अशा अनेक जातींच्या शेळीच्या अंगावर कमी प्रमाणत केस असतात. मात्र, काठेवाडी जातीच्या शेळीच्या अंगावर खूप केस असतात. अर्थात काठेवाडी शेळी ही केसाळू शेळी असते त्यामुळे लोकांना या केसांचे काय करायचे ही अडचण वाटते. पण या केसांमुळे आपणास कोणतीही अडचण निर्माण होणार नाही. जसे जसे केस वाढतील तसे तसे मेंढीप्रमाणे ते तुम्ही ट्रीम करू शकतात.

कुठून कराल खरेदी? तुम्हाला जर काठेवाडी जातीची शेळी घ्यायची असेल तर त्यासाठी तुम्हाला जळगाव जिल्ह्यातील चाळीसगावला जावे लागेल.

त्या ठिकाणी शेळ्यांचा आठवड्यातून एक दिवस आठवडे बाजार भरतो. याव्यतिरिक्त भुसावळ तसेच गुजरातमधील भावनगर येथे देखील मोठ्या प्रमाणात काठेवाडी शेळी पाहायला मिळते. या गावामधून तुम्ही काठेवाडी शेळी खरेदी करू शकतात.

# पाऊस कमी असल्याने पिकांची निवड ठरणार महत्वाची

भारतातील शेती मान्सूनवर अवलंबून आहे. पाऊस नसल्याने शेतकऱ्यांनी पेरणीची घाई करू नये. पिके घेताना जमिनीच्या पोताप्रमाणे पिके घ्यावीत. चांगला पाऊस झाल्यानंतर जमिनीत खोलवर ओल आल्यानंतरच पेरणी करावी. बियाणे उगवून येईल; मात्र, पाऊस थांबला तर पीक वाढीसाठी जमिनीत ओल असणे गरजेचे आहे.

जूनचा चौथा आठवडा सुरू होत आहे; मात्र, कोकणातील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग तसेच राज्यातील एक-दोन जिल्हेवगळता उर्वरित महाराष्ट्रात अजून पावसाचे आगमन झालेले नाही. त्यामुळे उष्णतेचा दाह वाढला आहे. हवामानाचा अंदाज वर्तविणाऱ्या जगभरातील वेगवेगळ्या संस्थांनी आशिया खंडात एल निनोमुळे कमी पावसाचा अंदाज वर्तविला आहे, भारतीय हवामान शास्त्र विभागाने सरासरीच्या ९२ टक्के पावसाचा पहिला अंदाज वर्तविला होता. दुसरा अंदाज सरासरीच्या ९० टक्के पावसाचा होता. त्यात ५ टक्के कमी-अधिक असतात, म्हणजे ८५ टक्क्यांपर्यंतही पाऊस होऊ शकतो. ही पाण्याच्या गंभीर संकटाची स्थिती आहे. आशिया खंडातील काही देशांसाठी हे दुष्काळी वर्ष ठरू शकते, असे काही आंतरराष्ट्रीय संस्थांचे म्हणणे आहे. एल निनोचा प्रभाव, जगभरात मोठ्या प्रमाणात वृक्षतोड ही यामागील प्रमुख कारणे आहेत. अंदमानात वेळेपूर्वी आलेल्या पावसाला पुढे गती मिळाली नाही. केरळात त्यामुळे तो उशिरा दाखल झाला. कोकणातील रत्नागिरी आणि सिंधुदुर्ग जिल्ह्यात मान्सून दाखल झाला आहे. मात्र, सध्या तेथेही पाऊस उघडला आहे. राज्यातील इतर भागांत पाऊस पडलेला नाही.

चारा पिके महत्त्वाची ठरणार :आगामी काळात चारा टंचाई निर्माण होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यामुळे पशुधन व दुग्धोत्पादनावर विपरीत परिणाम होऊ नये, यासाठी पशुपालकांनी सतर्क राहून चारा पिकांचे नियोजन करावे. त्यामुळे फेब्रुवारी ते जून २०२७ या टंचाईच्या काळात त्याचा वापर करता येईल.

जमिनीच्या पोतानुसार पिके : हलकी जमीन - उथळ जमीन अर्थात ६ इंच खोल जमिनीत मूग, उडिद, मटकी, चवळी ही पिके घ्यावीत. ही ८० ते १०० दिवसांची पिके आहेत.

मध्यम खोल जमीन - सोयाबीनचे पीक घेता येईल. बाजरी अधिक तूर ही पिके घेता येतील. खरीप ज्वारीचे पीकही फायदेशीर आहे. तृणधान्यांमुळे जनावरांना चारा आणि खाण्यासाठी धान्य मिळेल.अतिखोल जमीन - : कापसाचे पीक घेता येईल. बागायती क्षेत्र - भाजीपाला, कांदा घेता येईल. मात्र, चांगला पाऊस झाल्यानंतर त्याचा निर्णय घेता येईल.



# फळबागेमध्ये हवे भरपूर उत्पादन तर करा संजीवकांचा वापर

पिकाच्या आणि फळबागांच्या भरघोस उत्पादनासाठी विविध प्रकारच्या पोषक घटकांची गरज असते व ही गरज विविध प्रकारचे रासायनिक खते तसेच विद्राव्य खतांच्या माध्यमातून पूर्ण केली जाते. या सगळ्या व्यवस्थापनामध्ये फळबागांसाठी संजीवकांचा वापर हा खूप महत्त्वाचा असतो. फळबागामध्ये संजीवकांचा वापराचे अनेक फायदे आहेत.

संजीवके म्हणजे काय?

सजीव वनस्पतींमध्ये जी रासायनिक द्रव्य प्रमाणामध्ये कार्यरत होऊन त्या वनस्पतीच्या अंतर्गत कार्यपद्धतीत बदल घडवून आणतात त्यांना वनस्पती संजीवके म्हणतात. संजीवकांचे वाढ प्रेरक आणि वाढ निरोधक असे दोन मुख्य प्रकार आहेत.

फळझाडांमध्ये संजीवकांचे उपयोग : वनस्पतीमध्ये अभिवृद्धी करण्यासाठी- जेव्हा आपण कलमा करतो तेव्हा फाटे व गुटी कलमांना लवकर आणि भरपूर मुळे येण्यासाठी संजीवकांचा वापर होतो. शेंडा कलम, भेट कलम आणि डोळा भरणे या कलम पद्धतीत खुंट आणि सायन यांचे मिलन साधून एकजीव होण्यासाठी संजीवके मदत करतात. कलमे जगण्यासाठी आणि चांगल्या पद्धतीने वाढण्यासाठी देखील संजीवकांचा उपयोग होतो. फळांचा बहर नियंत्रित करण्यासाठी- फळांमध्ये फुलांचा बहर येण्याअगोदर झाडांची शाखीय वाढ



पूर्ण व्हावी लागते. वनस्पतीच्या अंतर्गत शरीरक्रिया आणि बाह्य वातावरण यांच्या एकत्रित परिणामामुळे शाखिय वाढ पूर्ण होण्यासाठी कमी अधिक वेळ लागतो. शाखीय वाढ होऊन ती पक्क झाल्यावर डोळ्यात फुलांची निर्मिती होते. ही निर्मिती काही काळ सुप्तावस्थेत राहते आणि ठराविक कालावधीनंतर डोळ्यातून फुलांचा मोहर बहराच्या रुपाने बाहेर पडण्यासाठी फळझाडांची अंतर्गत स्थिती आणि बाह्य वातावरणातील वातावरणातील सूर्यप्रकाश, आद्रता आणि तापमान या घटकांचा समन्वय साधण्यासाठी संजीवकांचा वापर होतो. झाडांच्या आकार मर्यादित राखण्यासाठी व उत्पादनक्षमता वाढवण्यासाठी बऱ्याचदा आपण पाहतो की फळ झाडांचा विस्तार जास्त मोठा होतो व त्यावर फळे खूप कमी लागतात. झाडांची वाढ झाल्यामुळे फळांची निगा राखणे व काढणे या गोष्टीदेखील अडचणीच्या होतात. अशा मध्ये झाडांची वाढ आणि विस्तार मर्यादित राखण्यासाठी मॅलिक हायड्रोझाईन क्लोरमक्काट इत्यादी संजीवके उपयुक्त ठरतात. सगळ्यात महत्त्वाचे म्हणजे फळझाडांच्या मर्यादित वाढ आणि विस्तारामुळे दर हेक्टरी झाडांची संख्या वाढवून घेता येते आणि उत्पादन क्षमता वाढते. फळपिकांचा काटकपणा आणि उत्पादन क्षमता- फळबागांमध्ये संजीवकांचा वापर करून झाडांना काटकपणा तसेच उत्पादनाची सुरुवात लवकर करता येते. आपल्याला माहित आहेच कि बरीच फळझाडे बहुवर्षीय असल्यामुळे सुरुवातीचे काही वर्षे फक्त त्यांची शाखीय वाढ होत असते. ही वाढ होत असताना संजीवकांचा वापर केला तर शाखीय वाढीवर मर्यादा येऊन फळे येण्याची व्यवस्था लवकर सुरू होते. शाखीय वाढ होत असताना शाखात लुसलुशीतपणा असतो व त्यामुळे हा भाग विशेष हवामानातील पाणीटंचाई किंवा रोग व किडींना लवकर बळी पडतो. परंतु संजीवकांचा वापर केल्यावर हा भाग कणखर बनतो.

## दिन विशेष

### जागतिक दिवस
### जागतिक ऑलिम्पिक दिवस
### आंतरराष्ट्रीय विधवा दिन

### महत्वाच्या घटना

१७५७ : प्लासीची लढाई : 'पलाशी' येथे रॉबर्ट क्लाईवच्या ३,००० सैन्याने सिराज उद्दौलाच्या ५०,००० सैन्याचा फितुरी करवून पराभव केला.
१८६८ : क्रिस्टोफर लॅथम शॉल्स यांना टाईप-राइटर च्या शोधासाठी पेटंट मिळाले.
१८९४ : पॅरिस येथे आंतरराष्ट्रीय ऑलिम्पिक समितिची स्थापना झाली.
१९१२ : ऍलन ट्युरिंग, इंग्लिश गणितज्ञ व संगणकशास्त्रज्ञ.
१९२७ : भारतीय नभोवाणी मुंबई येथे सुरु.
१९६० : अमेरिका आणि जापान देशांमध्ये सुरक्षा संबंधी समझोता करण्यात आला.
१९६९ : आय.बी.एम. ने जाहीर केले की जानेवारी १९९७ पासून सॉफ्टवेअर आणि इतर सेवांची किंमत वेगवेगळी होईल त्यामुळे आधुनिक सॉफ्टवेअर उद्योग सुरु झाला.
१९७९ : इंग्लंडला ९२ धावांनी हरवून वेस्ट इंडिजने दुसरा क्रिकेट विश्वकरंडक जिंकला.
१९८५ : दहशतवादी बॉम्बचा एअर इंडियाच्या कनिष्क बोइंग ७४७ विमानात स्फोट. ३२९ ठार.
१९९६ : आवामी लीगच्या शेख हसीना वाजेद यांचा बांगलादेशच्या पंतप्रधान म्हणून शपथविधी झाला. या बांगलादेशच्या दुसर्या महिला पंतप्रधान होत.
१९९८ : दुसर्या महायुद्धात जपानच्या शरणागतीची साक्षीदार असलेली 'यू. एस. एस. मिसुरी' ही युद्धनौका निवृत्तीनंतर पर्ल हार्बर बंदरात दाखल झाली.
२०१६ : युनायटेड किंग्डम ने ५२% ते ४८% मतदान होऊन युरोपियन युनियनला सोडले.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१८७७ : भारतीय-इंग्लिश अभिनेते नॉर्मन प्रिचर्ड यांचा जन्म. (मृत्यू: ३१ ऑक्टोबर १९२९)
१९०१ : राजेन्द्र नाथ लाहिरी क्रांतिकारक (मृत्यू: १७ डिसेंबर १९२७)
१९०६ : वीर विक्रम शाह 'त्रिभुवन' नेपाळचे राजे (मृत्यू: १३ मार्च १९५५)
१९१६ : सर लिओनार्ड तथा 'लेन' हटन इंग्लिश क्रिकेटपटू (मृत्यू: ६ सप्टेंबर १९९०)
१९२९ : पाच वेळेच्या ग्रॅमी पुरस्कार विजेता अमेरिकन गायिका, गीतकार, अभिनेत्री, नर्तक, विनोदकार आणि लेखिका जून कार्टर यांचा जन्मदिन.
१९३४ : राष्ट्रीय एकात्मतासाठी इंदिरा गांधी पुरस्कार, गांधी पीस पुरस्कार, पद्मभूषण पुरस्कार सन्मानित भारतीय गांधीवादी पर्यावरणवादी आणि सामाजिक कार्यकर्ते तसचं, दशोली ग्राम स्वराज्य संघाचे संस्थापक चंडीप्रसाद भट्ट यांचा जन्मदिन.
१९३४ : प्रसिद्ध भारतीय राजकारणी, व हिमाचल प्रदेशाचे माजी (४थे) मुख्यमंत्री वीरभद्र सिंह यांचा जन्मदिन.
१९३५ : मराठी लेखक राम कोलारकर यांचा जन्म.
१९३६ : ग्रीक पंतप्रधान कॉस्टास सिमिटिस यांचा जन्म.
१९४२ : दिग्दर्शक जब्बार पटेल यांचा जन्म. जब्बार रझाक पटेल हे मराठी चित्रपटसृष्टीतील आणि हिंदी चित्रपटसृष्टीतील एक नाट्य आणि चित्रपट दिग्दर्शक आहेत. अनेक पैलू असणाऱ्या आंबेडकरांचे जीवन तीन तासाच्या चित्रपटात रेखाटणे ही अवघड बाब असताना त्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकरांवरील चित्रपट केला. या चित्रपटाने त्यांना अनेक पुरस्कार मिळवून दिले.
१९४८ : नबरुण भट्टाचार्य भारतीय पत्रकार आणि लेखक (निधन: ३१ जुलै २०१४)
१९५२ : राज बब्बर, भारतीय चित्रपट अभिनेते, राजकीय नेते
१९७२ : झिनेदिन झिदान फ्रेन्च फूटबॉलपटू
१९८० : वेस्ट इंडीजचा क्रिकेट खेळाडू रामनरेश सरवण यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

७९ : ७९ई.पुर्व: रोमन सम्राट व्हेस्पासियन यांचे निधन. (जन्म: १७ नोव्हेंबर ०००९)
१७६१ : बाळाजी बाजीराव तथा नानासाहेब पेशवे यांचे निधन. (जन्म: ८ डिसेंबर १७२१)
१८३६ : स्कॉटिश तत्त्ववेत्ते, इतिहासकार व अर्थशास्त्रज्ञ जेम्स मिल यांचे निधन. (जन्म: ६ एप्रिल १७७३)
१८९१ : विल्हेल्म एडवर्ड वेबर (छायाचित्र पहा), जर्मन भौतिकशास्त्रज्ञ.
१९१४ : भारतीय गुरु आणि तत्वज्ञ भक्तिविनाडो ठाकूर यांचे निधन. (जन्म: २ सप्टेंबर १८३८)
१९३९ : आधुनिक बालशिक्षण क्षेत्रातील कार्यकर्ते गिजुभाई बधेका यांचे निधन. (जन्म: १५ नोव्हेंबर १८८५ चितल, अमरेली, गुजराथ)
१९५३ : डॉ. श्यामाप्रसाद मुखर्जी, भारतीय जनसंघाचे संस्थापक, अध्यक्ष, शिक्षणतज्ज्ञ.
१९७५ : जनरल प्राणनाथ थापर, भारताचे भूसेनाप्रमुख. (जन्म: २३ मे १९०६)
१९८० : भारताचे माजी राष्ट्रपती, भारतरत्न व्ही. व्ही. गिरी यांचे निधन. (जन्म: १० ऑगस्ट १८९४)
१९८० : संजय गांधी, भारतीय राजकारणी (जन्म: १४ डिसेंबर १९४६)
१९८२ : बालगंधर्व आणि मास्टर कृष्णराव यांना ऑर्गनची साथ करणारे गंधर्व नाटकमंडळीतील नामवंत कलाकार हरिभाऊ देशपांडे यांचे निधन.
१९९० : चरित्र अभिनेते हरिन्द्रनाथ चट्टोपाध्याय यांचे निधन. (जन्म: २ एप्रिल १८९८ हैदराबाद, आंध्र प्रदेश)
१९९४ : नाटककार, साहित्यिक वसंतशांताराम देसाई यांचे निधन.
१९९५ : पोलिओची लस शोधणारे शास्त्रज्ञ डॉ. जोनस सॉक यांचे निधन.
१९९६ : ऑस्ट्रेलियन क्रिकेटपटू रे लिंडवॉल यांचे निधन. (जन्म: ३ ऑक्टोबर १९२१)
२००५ : साहित्यिक डॉ. हे. वि. इनामदार यांचे निधन.
२०१५ : भारतीय नन, वकील, आणि समाजसेवक निर्मला जोशी यांचे निधन. (जन्म: २३ जुलै १९३४)
२०२० : निलंबर देव शर्मा डोंगरी भाषेतील साहित्याबद्दल इंग्रजीतील पहिले प्रकाशन केलेले लेखक पद्मश्री (जन्म: ६ ऑक्टोबर १९३१)

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत



# माहिती अधिकाराची धार बोथट केल्यास प्राणाची आहुती देईन

## नियम बदलल्याने अण्णा हजारे आक्रमक, ५ जुलैपासून उपोषणाचा इशारा

अहिल्यानगर। प्रतिनिधी

माहितीचा अधिकार हा शासनाने जनतेवर केलेला उपकार नसून तो नागरिकांचा घटनात्मक अधिकार आहे. मात्र, राज्य सरकारने १२ जून २०२६ रोजी प्रसिद्ध केलेले 'महाराष्ट्र माहितीचा अधिकार नियम, २०२६' हे या कायद्याची धार बोथट करणारे आणि भ्रष्टाचाराला ढाल देणारे आहेत. प्रशासनातील ही हुकूमशाही मोडून काढण्यासाठी आणि माहितीचा अधिकार वाचवण्यासाठी मी माझ्या प्राणाची आहुती देण्यासही मागे हटणार नाही,'' असा थेट आणि निर्वाणीचा इशारा ज्येष्ठ समाजसेवक अण्णा हजारे यांनी राज्य सरकारला दिला आहे. या संदर्भात अण्णा हजारे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना एक सविस्तर आणि कडक पत्र पाठवले असून, १२ जूनच्या बेकायदेशीर दुरुस्त्या



त्वरित रद्द न केल्यास ५ जुलै २०२६ पासून राळेगणसिद्धी येथील यादवबाबा मंदिरात आमरण उपोषण सुरू करणार असल्याचा इशारा दिला आहे. अण्णा हजारे यांनी पत्रात नमूद केले आहे की, १९९८ पासून त्यांनी माहितीच्या अधिकारासाठी संपूर्ण महाराष्ट्रभर दौरे केले आणि अनेकदा ऐतिहासिक उपोषणे केली. मात्र, २० वर्षांनंतर सरकारने केलेल्या नवीन दुरुस्त्या या कायद्याचा मूळ आत्माच नष्ट करणाऱ्या आहेत. जनतेला विश्वासात न घेता हे नियम तयार करण्यात आले असून, यामुळे 'माहिती देणे अपवाद आणि माहिती नाकारणे हाच नियम' अशी उलटी परिस्थिती निर्माण होईल, अशी भीती अण्णा हजारे यांनी व्यक्त केली आहे.

ओळखपत्र जोडण्याची बेकायदेशीर सक्ती : कायद्याच्या कलम ६(२) नुसार अर्जदाराला वैयक्तिक तपशील देण्याची गरज नाही. ओळखपत्र सक्तीचे केल्याने माहिती मागणाऱ्यांची गोपनीयता धोक्यात येईल आणि भ्रष्टाचार उघड करणाऱ्या 'व्हिसलब्लोअर्स'च्या सुरक्षेचा प्रश्न निर्माण होईल. माहिती मागण्याचे कारण विचारणे : लोकशाहीत नागरिक मालक आणि शासन लोकसेवक आहे. नागरिकाने माहिती का मागितली याचा जाब विचारण्याचा अधिकार अधिकाऱ्यांना नाही.

यामुळे अधिकारी मनमानी पद्धतीने अर्ज फेटाळू शकतात. तर्कहीन शुल्कवाढ : आरटीआय हा महसूल गोळा करण्याचा कायदा नाही. जर नागरिकांवर आर्थिक भार वाढवला, तर माहिती न देणाऱ्या दोषी अधिकाऱ्यांच्या दंडाची रक्कम का वाढवली नाही? हा एकतर्फी अन्याय आहे. 'एक विषय एक अर्ज'ची जाचक अट : प्रशासकीय निर्णय एकमेकांशी जोडलेले असतात. या अटीमुळे सर्वसामान्य नागरिकांना एकाच कामासाठी अनेक अर्ज करावे लागतील, ज्यामुळे वेळ आणि पैसा दोन्ही वाया जाईल. पुनरावृत्ती अर्ज निकाली काढण्याची तरतूद : अनेकदा अधिकारी अपूर्ण किंवा खोटी माहिती देतात. अशा वेळी पुन्हा अर्ज करावा लागतो. केवळ ''पूर्वी माहिती दिली होती'' हे कारण पुढे करून अर्ज फेटाळणे म्हणजे भ्रष्टाचाराला पाठीशी घालण्यासारखे आहे. सुनावणीला गैरहजर राहिल्यास अपील फेटाळणे : कामाच्या व्यापामुळे किंवा नोटीस उशिरा मिळाल्याने नागरिक गैरहजर राहू शकतात. अशा वेळी उपलब्ध कागदपत्रांवरून निकाल देण्याऐवजी अपील थेट निकाली काढणे दोषी अधिकाऱ्यांच्या पथ्यावर पडणारे आहे. अर्जदाराच्या मृत्यूनंतर केस बंद होणे : सुनावणी प्रलंबित असताना अर्जदाराचा मृत्यू झाल्यास केस बंद करण्याचा नियम अत्यंत चुकीचा आहे. कोर्टाप्रमाणेच येथेही त्यांच्या वारसांना केस चालवण्याचा अधिकार मिळाला पाहिजे. वकिलांची मदत घेण्यास बंदी : माहिती आयोग ही एक अर्ध-न्यायिक संस्था आहे.

सर्वसामान्य नागरिकांना कायदेशीर क्लिष्टता समजत नाही. अशा वेळी त्यांना वकिलांची मदत घेण्यापासून रोखणे म्हणजे न्याय नाकारण्यासारखे आहे. 'सुओ-मोटो' (कलम ४) कडे दुर्लक्ष : शासनाने स्वतःहून सर्व माहिती (अर्थसंकल्प, निविदा, खर्च) वेबसाईटवर अद्ययावत केली, तर नागरिकांना अर्ज करण्याची गरजच पडणार नाही. मात्र, या मूळ त्रुटी दूर करण्याऐवजी नागरिकांवरच निर्बंध लादले जात आहेत.

---

## अहिल्यानगरमध्ये २ हजारांवर नागरिकांच्या उपस्थितीत शहरात योग दिन साजरा

### सावेडी येथील जॉगिंग पार्कमध्ये रंगला योगमय सोहळा



अहिल्यानगर। प्रतिनिधी

जिल्हा प्रशासन, मनपा, जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, क्रीडा भारती, विविध योग संस्था आणि एकविध खेळ संघटना यांच्या संयुक्त विद्यमाने शहरात १२ वा आंतरराष्ट्रीय योग दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. रविवारी सकाळी सावेडी येथील जॉगिंग पार्कच्या मैदानावर हा योगमय सोहळा पार पडला. निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते व महापौर ज्योती गाडे यांच्या हस्ते दीपप्रज्वलनाने या कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले. या प्रसंगी जिल्हा परिषद माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी संध्याताई गायकवाड, जिल्हा क्रीडा अधिकारी ज्ञानेश्वर खुरंगे, क्रीडा भारतीचे चंद्रशेखर कुलकर्णी, अभय महाजन, डॉ. रविंद्र साताळकर, डॉ. हर्षवर्धन तन्वर, गिरीश कुलकर्णी, शिवछत्रपती क्रीडा पुरस्कार विजेते निर्मल थोरात, सुनील जाधव, मनीषा पुंडे, कोमल वाकळे यांच्यासह विविध शाळा-महाविद्यालयांचे विद्यार्थी, मुख्याध्यापक, क्रीडा शिक्षक, खेळाडू आणि पालकांसह २ हजारांपेक्षा अधिक नागरिकांनी उपस्थित राहून सामूहिक योगासने केली.

महापौर गाडे म्हणाल्या, प्राचीन काळापासून भारतीय संस्कृतीत योगाला अनन्यसाधारण महत्त्व आहे. आजच्या धकाधकीच्या जीवनशैलीत शरीरस्वास्थ्याकडे दुर्लक्ष होत असताना, योगामुळे केवळ शरीर निरोगी राहत नाही, तर मानसिक शांतता आणि सकारात्मक ऊर्जा देखील प्राप्त होते. त्यामुळे प्रत्येकाने योगाला आपल्या दैनंदिन जीवनाचा अविभाज्य भाग बनवावे. निवासी उपजिल्हाधिकारी दादासाहेब गिते म्हणाले, योग ही आरोग्याची गुरुकिल्ली असून निरोगी जीवनासाठी नियमित योगाभ्यास आवश्यक आहे. जिल्हावासीयांनी नियमित योग करून आरोग्यदायी जीवनशैलीचा स्वीकार करावा. या वेळी त्यांनी उपस्थितांना शारीरिक, मानसिक आणि भावनिक संतुलन राखण्याचा संकल्प करून शपथ दिली. विविध योगासनांचा उत्साहपूर्ण सराव एम.एम.वाय.टी.सी. संस्थेच्या अनुभवी योग प्रशिक्षकांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या सामूहिक योगसत्रात प्रार्थना, सूक्ष्म व्यायाम, विविध योगासने, सूर्यनमस्कार, प्राणायाम आणि ध्यानधारणा यांचे प्रभावी सादरीकरण करण्यात आले. हा सोहळा यशस्वी करण्यासाठी क्रीडा भारतीचे वेदपाल तन्वर, सुधीर चपळगावकर, अमोल धोपावकर, कीर्ती धोपावकर, प्रियांका खिंडरे, रंजन तडवी, प्रवीण कोंढावळे, विशाल गर्जे, संतोष वाबळे आदींनी परिश्रम घेतले.

---

## भोकरदनमधील सर्वात मोठा जलप्रकल्प असलेल्या धामणा धरणात केवळ १२% साठा

भोकरदन। प्रतिनिधी

भोकरदन तालुक्यातील सर्वात मोठा जलप्रकल्प असलेल्या शेलूद येथील धामणा मध्यम प्रकल्पात भीषण स्थिती झाली आहे. अल्प पर्जन्यमान. एल निनोचे सावट. धरणात आता केवळ १२ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे. पुढील काळात तीव्र पाणीटंचाईची शक्यता आहे. प्रशासनाने अवैध पाणी उपशावर कडक पाळत सुरू केली आहे. धरणातून शेती किंवा इतर कारणांसाठी बेकायदेशीर पाणी उपसा केल्यास थेट फौजदारी कारवाईचा इशारा दिला आहे. धामणा प्रकल्पातून १२ ग्रामपंचायतींच्या हद्दीतील गावांना पिण्याच्या पाण्याचा पुरवठा होतो. आन्वा, धावडा, जळगाव सपकाळ, लिहा, पारध बुद्रुक, पारध खुर्द, हिसोडा खुर्द, हिसोडा बुद्रुक, शेलूद, वडोद तांगडा, पोखरी, वालसावंगी, जळकी बाजार, खुपटा या गावांचा यात समावेश आहे. या गावांसाठी धरणातील पाणी आरक्षित ठेवण्यात आले आहे.



धरणालगत काही शेतकरी विद्युत पंप, मोटारी, इतर उपकरणांद्वारे बेकायदेशीर पाणी उपसा करत असल्याच्या तक्रारी प्रशासनाकडे आल्या होत्या.

पाटबंधारे विभागाने सांगितले, धरणात फक्त १२ टक्के पाणी शिल्लक आहे. हे पाणी नागरिकांच्या पिण्यासाठी सुरक्षित ठेवणे गरजेचे आहे. पाणीचोरी रोखणे हेच मुख्य उद्दिष्ट आहे. पिण्याच्या पाण्याची टंचाई टाळण्यासाठी उपविभागीय अधिकारी तथा दंडाधिकारी यांनी प्रतिबंधात्मक आदेश जारी केले आहेत. पाटबंधारे, महसूल, ग्रामविकास विभागाचे संयुक्त पथक तयार केले आहे. अधिकारी, कर्मचारी २४ तास गस्त घालत आहेत. गेल्या १५ दिवसांपासून ही मोहीम सुरू आहे. या काळात धरण परिसरात एकही अवैध विद्युत पंप किंवा पाणी उपसा करणारे उपकरण आढळलेले नाही. प्रशासनाच्या कडक भूमिकेमुळे पाणी चोरांचे धाबे दणाणले आहेत. दरम्यान, कालवा निरीक्षक रवी पायघन, के. के. जाधव, जी. आर. जाधव, भाग्यश्री खुर्दे, हुडेकर, तलाठी प्रतिभा बोडखे, अंकुश बावस्कर, एस. आर. तराळ, एस. आर. सोनवणे, ग्रामसेवक सागर दाभाडे, आर. एस. दौड, सुभाष दळवी या पथकाने धरण क्षेत्राची पाहणी केली. धामण धरण परिसरात पथकाने धरण क्षेत्राची पाहणी केली. मोटारी जप्त करण्याची कारवाई ''भविष्यातील पाणीटंचाई पाहता शेतकऱ्यांनी सहकार्य करावे. धरणातून छुप्या मार्गाने पाणी उपसा करण्याचा प्रयत्न केल्यास विद्युत पंप जप्त केले जातील. संबंधित व्यक्तीवर कायदेशीर गुन्हे दाखल करण्यात येतील,'' असा कडक इशारा संयुक्त पथकाकडून देण्यात आला आहे.

---

## धावपळीच्या युगात तणावमुक्त, निरोगीजीवन जगण्यासाठी योग काळाची गरज-आ.संतोष दानवे

भोकरदन। प्रतिनिधी

मनाची शांतता आणि शरीराची सुदृढता हीच खऱ्या आरोग्याची गुरुकिल्ली आहे. योग ही भारताने संपूर्ण जगाला दिलेली एक अमूल्य आणि श्रेष्ठ देणगी आहे. आजच्या अत्यंत धावपळीच्या आणि धकाधकीच्या युगात तणावमुक्त आणि निरोगी जीवन जगण्यासाठी योग ही काळाची गरज बनली आहे. प्रत्येकाने आपल्या दैनंदिन जीवनात योगाचा नियमित अंतर्भाव करावा,'' असे आवाहन महाराष्ट्र पंचायत राज समितीचे अध्यक्ष तथा आमदार संतोष पाटील दानवे यांनी केले.

भोकरदन येथे आंतरराष्ट्रीय योग दिनाचे औचित्य साधून पतंजली योग समिती (जालना) व मोरेश्वर महाविद्यालय (भोकरदन) यांच्या संयुक्त विद्यमाने 'योग



अभ्यास शिबिराचे' आयोजन करण्यात आले होते. या शिबिराच्या उद्घाटन प्रसंगी ते बोलत होते. यावेळी मोरेश्वर महाविद्यालयाचे प्राचार्य भगवान डोंगरे, प्रमुख योग शिक्षिका यशोदीपा गिरी यांची उपस्थिती होती. आमदार संतोष दानवे पुढे म्हणाले की, शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी योग अत्यंत फायदेशीर आहे. निरोगी, सशक्त आणि सुदृढ समाज घडवण्यासाठी आपण सर्वांनी आधी स्वतःपासून योगाची सुरुवात करणे आवश्यक आहे. नियमित योगासनांमुळे शरीराला ऊर्जा मिळते. मन विचलित न होता शांत राहण्यास मदत होते. या सामूहिक योग अभ्यास शिबिरासाठी भाजपचे स्थानिक पदाधिकारी, कार्यकर्ते, मोरेश्वर महाविद्यालयाचे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी, पतंजली योग समितीचे प्रतिनिधी, शहरातील प्रतिष्ठित नागरिक, युवक आणि महिला मोठ्या संख्येने उपस्थित होत्या. उपस्थित सर्वांनीच आरोग्याचा हा मूलमंत्र आपल्या दैनंदिन जीवनात जपण्याचा संकल्प यावेळी केला. या शिबिरात योग गुरु यशोदीपा गिरी यांच्या मार्गदर्शनाखाली प्रत्यक्ष योगसाधनेला सुरुवात झाली. आमदार संतोष दानवे यांच्यासह उपस्थित सर्व नागरिक, तरुण मित्र आणि महिला भगिनींनी प्रत्यक्ष मैदानावर योगासने, प्राणायाम आणि ध्यान केले. योग गुरु गिरी यांनी विविध आसनांचे महत्त्व आणि त्याचे शरीरावर होणारे सकारात्मक परिणाम प्रात्यक्षिकांसह समजावून सांगितले. सर्वांनी मिळून केलेल्या या सामूहिक योगसाधनेमुळे संपूर्ण परिसरात अत्यंत ऊर्जादायी, सकारात्मक आणि उत्साही वातावरण निर्माण झाले होते.

---

## कोरडी शेते, घटती पाणीपातळी; पाऊस लांबल्याने संकट

### जून संपत आला तरी वरुणराजा रुसलेलाच

मंठा । प्रतिनिधी

तालुक्यात खरीप हंगामाची सर्व पूर्वतयारी पूर्ण झाली असली, तरी अद्याप पाऊस न झाल्याने बळीराजाची चिंता कमालीची वाढली आहे. जून महिना संपत आला तरी पेरणीयोग्य पाऊस न झाल्यामुळे संपूर्ण तालुक्यातील खरीप पेरण्या ठप्प झाल्याचे चित्र आहे. वेळेत पेरणी झाल्यास उत्पादन चांगले मिळते. या आशेने शेतकऱ्यांनी मशागतीची सर्व कामे वेळेत आटोपली होती. बँका, सोसायट्या किंवा उसनवारी करून बियाणे व खते खरेदी करून ठेवली आहेत. मात्र, पावसाअभावी ही सर्व तयारी सध्या घरातच पडून असल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. आता शेतकऱ्यांच्या नजरा आकाशाकडे लागल्या आहेत.यंदा तालुक्यात मॉन्सूनपूर्व पाऊसही न झाल्याने शेतजमिनी कमालीच्या कोरड्या ठाक पडल्या आहेत. पेरणीसाठी जमिनीत आवश्यक असणारा ओलावाच उपलब्ध नाही. त्यामुळे शेतकरी आता दररोज आभाळाकडे डोळे लावून पावसाची आतुरतेने वाट पाहत आहेत. पाऊस आणखी काही दिवस लांबल्यास त्याचा थेट परिणाम खरीप हंगामाच्या उत्पादनावर होण्याची भीती कृषी तज्ज्ञांकडून व्यक्त केली जात आहे.

दुसरीकडे, वाढत्या उष्णतेमुळे नागरिकांसह जनावरांनाही तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा



लागत आहे. तालुक्यातील अनेक गावांमधील विहिरी व बोअरवेलची पाणीपातळी खालावली आहे. त्यामुळे जनावरांच्या पिण्याच्या पाण्याचा प्रश्न गंभीर बनला आहे. पावसाचा हा विलंब असाच कायम राहिल्यास ग्रामीण भागात पिण्याच्या पाण्याचे संकट अधिक गडद होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. पेरण्या सुरू न झाल्याने बाजारातील कृषी सेवा केंद्रांमध्येही नेहमीसारखी वर्दळ दिसून येत नाही. बियाणे व खतांची विक्री मंदावली आहे. त्यामुळे बाजारपेठेत शुकशुकाट पसरला आहे. आता संपूर्ण मंठा तालुक्याचे लक्ष केवळ आणि केवळ वरुणराजाच्या आगमनाकडे लागले आहे.ज्या शेतकऱ्यांकडे बोरवेल, विहीर व तलाव शेजारी आहेत, तसेच सिंचन व्यवस्था आहे, अशा शेतकऱ्यांनी हळदीची लागवड केली आहे. परंतु पाऊस न पडल्यामुळे दुष्काळजन्य परिस्थिती निर्माण झाली आहे. या आठवड्यात पाऊस न पडल्यास ज्या शेतकऱ्यांनी हळद व उसाची लागवड केली आहे, त्या शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होणार आहे. पाऊस न आल्यास हळद जमिनीत सडून जाईल. ऊसालाही पाणी न मिळाल्याने तो वाळत आहे. त्यामुळे शेतकऱ्यांमध्ये चिंतेचे वातावरण आहे. दरम्यान, जून महिना उलटत आला तरी पाऊस पडायला तयार नाही. आम्ही शेतामध्ये मोठ्या आशेने हळदीची लागवड केली आहे. परंतु, सध्याची परिस्थिती पाहता पुढील आठवड्यात जर पाऊस झाला नाही, तर ही हळद जमिनीतच सडून जाईल. आर्थिक नुकसान होणार आहे. आता निसर्गाच्या हातात असल्याचे महादेव वरकड म्हणाले. हळद उत्पादक धास्तावले मंठा तालुक्यात काही शेतकऱ्यांनी धाडस करून हळदीची लागवड केली आहे. परंतु, पावसाने दडी मारल्यामुळे या पिकाच्या अस्तित्वाचा प्रश्न निर्माण झाला आहे. पाणी नसल्याने जमिनीतील हळदीचे कंद कुजण्याची किंवा सुकण्याची भीती निर्माण झाली आहे. जर पुढील एका आठवड्यात समाधानकारक पाऊस झाला नाही, तर हळदीचे पीक शेतातच सोडून देण्याची वेळ शेतकऱ्यांवर येईल. त्यामुळे लाखो रुपयांचे आर्थिक नुकसान सोसावे लागणार आहे.

---

## सख्ख्या भावांवर हल्ला करणाऱ्या आरोपींची बाजारसावंगी गावात धिंड



खुलताबाद। प्रतिनिधी

तालुक्यातील बाजार सावंगी येथे थुंकण्यास विरोध केल्याच्या क्षुल्लक कारणावरून दोन सख्ख्या भावांवर सहा जणांच्या टोळक्याने जीवघेणा हल्ला केला होता. या घटनेनंतर खुलताबाद पोलिसांनी कारवाई करत मुख्य आरोपींची शनिवारी बाजारसावंगी बाजारपेठेतून धिंड काढून कायद्याचा धाक दाखवला.

बाजार सावंगी येथील एका चहाच्या हॉटेलमध्ये गुरुवारी थुंकण्यास विरोध केल्याने काही युवकांनी राग मनात धरला. त्यानंतर त्यांनी संबंधित दोन सख्ख्या भावांना गाठून लाकडी दांडे, लोखंडी रॉड व इतर हत्यारांच्या सहाय्याने मारहाण केली. या हल्ल्यात दोघांच्या डोक्याला गंभीर दुखापत झाली असून त्यांच्यावर छत्रपती संभाजीनगर येथील रुग्णालयात उपचार सुरू आहेत. पोलिस निरीक्षक प्रशांत महाजन यांनी तत्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थितीची पाहणी केली. गुन्ह्याचे गांभीर्य लक्षात घेऊन फॉरेन्सिक लॅबच्या पथकालाही पाचारण केले. अश्विन कारभारी नलावडे, अनिकेत गणेश नलावडे, मनोज अंकुश जाधव आणि आबाराव नलावडे यांना ताब्यात घेतले. तर बबलू शेख आणि शुभम देविदास सराटे हे दोघे अद्याप फरार असून त्यांचा शोध घेण्यासाठी विशेष पथके रवाना करण्यात आली आहेत. मुख्य आरोपी अनिकेत गणेश नलावडे याच्याविरुद्ध यापूर्वीही गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहे. पोलिसांनी आरोपींची धिंड काढली.

# उस्मानाबाद -लातूर-बीड मतदारसंघात भाजपाचे बसवराज पाटील विजयी

## पाटील यांना ८४४ तर देशमुख यांना १२५ मते, ४ मते ठरली अवैध, ७१९ मतांनी पाटील यांचा विजय

धाराशिव । प्रतिनिधी

महाराष्ट्र विधानपरिषदेच्या उस्मानाबाद लातूर बीड स्थानिक प्राधिकारी मतदारसंघ निवडणूक २०२६ च्या आज २२ जून रोजी झालेल्या मतमोजणीत भाजपचे उमेदवार बसवराज माधवराव पाटील यांनी विजय मिळविला.पाटील यांना एकूण ८४४ मते मिळाली,तर त्यांचे प्रतिस्पर्धी काँग्रेसचे महेश माणिकराव देशमुख यांना १२५ मते मिळाली.त्यामुळे बसवराज पाटील यांनी तब्बल ७१९ मतांच्या फरकाने विजय संपादन केला.



मतमोजणीच्या अंतिम निकालानुसार भाजपाच्या बसवराज माधवराव पाटील यांना टेबल क्रमांक १ वर १८४,टेबल क्रमांक २ वर १४४,टेबल क्रमांक ३ वर १९१,टेबल क्रमांक ४ वर १७७ आणि टेबल क्रमांक ५ वर १४८ अशी एकूण ८४४ मते मिळाली.दुसरीकडे महेश माणिकराव देशमुख यांना अनुक्रमे १०,५५,६,२१ आणि ३३ अशी एकूण १२५ मते मिळाली. मतमोजणीदरम्यान १४ मते अवैध ठरली. त्यामध्ये टेबल क्रमांक १ वर ६,टेबल क्रमांक २ वर १,टेबल क्रमांक ३ वर ३, टेबल क्रमांक ४ वर २ आणि टेबल क्रमांक ५ वर २ अवैध मतांचा समावेश होता.

या निवडणुकीत एकूण ९८३ मतपत्रिका प्राप्त झाल्या.त्यापैकी १४ मते अवैध ठरल्याने ९६९ वैध मते ग्राह्य धरण्यात आली.निवडून येण्यासाठी आवश्यक कोटा ४८५ मतांचा होता.बसवराज पाटील यांनी हा कोटा सहज पार करत विजयावर शिक्कामोर्तब केले.कार्यकर्त्यांनी निकाल जाहीर होताच जल्लोष साजरा केला.

### ना. पंकजा मुंडे यांनी केले नवनिर्वाचित आमदारांचे अभिनंदन

मुंबई । प्रतिनिधी



स्थानिक स्वराज्य संस्था विधानपरिषद निवडणुकीत भाजपा महायुतीची सरशी झाली असून १७ पैकी १६ जागांवर महायुतीने घवघवीत यश संपादन केले आहे. आजच्या मतमोजणीनंतर विजयी झालेल्या सर्व नवनिर्वाचित आमदारांचे राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री ना. पंकजाताई मुंडे यांनी अभिनंदन करुन शुभेच्छा दिल्या आहेत.

विधानपरिषदेच्या निवडणूकीच्या अकरा जागांची मतमोजणी आज झाली, यात दहा जागांवर भाजपा महायुतीचे आमदार मोठ्या मताधिक्याने विजयी झाले, एकूण १७ जागांपैकी यापूर्वी महायुतीच्या ६ जागा बिनविरोध निवडून आल्या होत्या, त्यामुळे आजच्या मतमोजणीनंतर महायुतीचे १६ आमदार विजयी झाले असून विरोधी आघाडीला एकही जागा मिळाली नाही.

पान ३ वर

# जुन्या वादातून तरुणावर लोखंडी गजाने हल्ला

## माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल

माजलगाव । प्रतिनिधी

तालुक्यातील राजेगाव येथील पिरूनाईक तांड्यावर राहणाऱ्या एका तरुणास जुन्या किरकोळ वादाच्या कारणावरून शिवीगाळ व मारहाण करण्यात आल्याची घटना दि १९ जुन रोजी रात्री घडली.दरम्यान हल्ला केल्याप्रकरणी चौघांविरुद्ध माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

पोलीस सूत्रांकडून मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी आमोल गोपीनाथ जाधव (रा.पिरूनाईक तांडा,राजेगाव, ता.माजलगाव) यांनी दिलेल्या तक्रारीवरून हा गुन्हा दाखल करण्यात आला. दि.१९ जून रोजी सायंकाळी सुमारे ६:०० वाजण्याच्या सुमारास माऊली फाटा येथील एका मंगल कार्यालयासमोरील रस्त्यावर ही घटना घडली. तक्रारीनुसार, आरोपी विशाल शंकर राठोड, अमोल राजू राठोड, अविनाश राजू राठोड व राजू उत्तम राठोड (सर्व रा. पिरूनाईक तांडा, राजेगाव) यांनी संगनमत करून जुन्या वादाचे कारण काढत फिर्यादीस शिवीगाळ केली. यावेळी आरोपी विशाल राठोड याने फिर्यादीची गचांडी धरून चापट-बुक्क्यांनी मारहाण केली.तर आरोपी अमोल राठोड याने लोखंडी गजाने फिर्यादीच्या डोक्यात वार करून जखमी केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे.तसेच अविनाश व राजू राठोड यांनी फिर्यादीच्या पोटात,छातीवर व नाकावर मारहाण केली. दरम्यान, भांडण सोडवण्यासाठी आलेल्या फिर्यादीच्या मित्रालाही आरोपींनी लाथाबुक्क्यांनी मारहाण केल्याचे तक्रारीत नमूद आहे. यानंतर पुन्हा आमच्या नादी लागलास तर जिवे मारून टाकू, अशी धमकीही आरोपींनी दिल्याचा आरोप करण्यात आला आहे.या प्रकरणी माजलगाव ग्रामीण पोलीस ठाण्यात गु.र.नं. २७४/२०२६ अन्वये कलम ११८(१), ११५(२), ३५२, ३५१(२) व ३(५) भारतीय न्याय संहिता (बीएनएस) अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास पोलीस करीत आहेत.

# गाढेवाडीच्या पाण्यावर डल्ला; अनधिकृत कनेक्शनमुळे ग्रामस्थांवर पाणीटंचाईचे संकट

## जलजीवनच्या मुख्य पाईपलाईनला अनधिकृत कनेक्शन; ग्रामस्थांचा आंदोलनाचा इशारा

गेवराई । प्रतिनिधी

जलजीवन मिशन अंतर्गत गाढेवाडी ग्रामस्थांसाठी पुरवठा करण्यात येणाऱ्या पाणीपुरवठा योजनेच्या मुख्य पाईपलाईनला अनधिकृत कनेक्शन घेऊन मोठ्या प्रमाणात पाणी चोरी होत असल्याचा गंभीर प्रकार समोर आला आहे. या पाणी चोरीमुळे गावात सध्या ग्रामस्थांनी भिषण पाणी टंचाईचा सामना करावा लागत आहे. याबाबत ग्रामपंचायत प्रशासनाला माहिती देवूनही कारवाई होत नसल्याने ग्रामस्थांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे. याप्रकरणी तहसीलदार तसेच गटविकास



अधिकारी यांच्याकडे कारवाईची मागणी करण्यात येणार असल्याचे गाढेवाडी ग्रामस्थांनी सांगितले आहे.

खडकी-कोळगाव येथील तलावात जलजीवन मिशन योजनेद्वारे विहीरीचे काम झालेले आहे. दरम्यान येथून गाढेवाडी गावाला पाणीपुरवठा केला जातो. मात्र कोळगाव येथील करांडे वस्तीनजीक काही नागरिकांनी मुख्य पाईपलाईनला अनधिकृतपणे एक इंच व पाऊण इंच पाईपचे कनेक्शन घेऊन मागील काही दिवसांपासून पाण्याची चोरी सुरू केली आहे. या कनेक्शनद्वारे मोठ्या प्रमाणात पाणी स्वतःच्या खाजगी विहिरीत सोडून शेतीसाठी वापरले जात असल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे. या प्रकारामुळे गाढेवाडी येथील सार्वजनिक पाण्याच्या टाकीत पुरेशा प्रमाणात पाणी पोहोचत नसल्याने संपूर्ण गावाला तीव्र पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे.

उन्हाळ्यानंतरही पावसाने पाठ फिरवल्याने आधीच पाण्याची टंचाई निर्माण झाली असताना पाणी चोरीच्या प्रकारामुळे परिस्थिती आणखी बिकट झाली आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक आणि सर्वसामान्य ग्रामस्थांना पिण्याच्या पाण्यासाठी वणवण भटकंती करावी लागत असल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे. या प्रकाराची माहिती कोळगाव ग्रामपंचायत प्रशासनाला वेळोवेळी देण्यात आली. मात्र अद्याप कोणतीही ठोस कारवाई करण्यात पान ३ वर

# आष्टीत स्मार्ट मीटरवरून मनसे आक्रमक

## निर्णय मागे घ्या, अन्यथा रस्त्यावर उतरू -कैलास दरेकर

आष्टी । प्रतिनिधी

आष्टी तालुक्यात महावितरणकडून सुरू असलेल्या स्मार्ट मीटर बसविण्याच्या प्रक्रियेविरोधात महाराष्ट्र नवनिर्माण सेना शेतकरी सेनेचे बीड जिल्हाध्यक्ष कैलास दरेकर यांनी आक्रमक भूमिका घेतली असून, शेतकरी व सर्वसामान्य ग्राहकांवर लादले जाणारे स्मार्ट मीटर तात्काळ स्थगित करण्याची मागणी केली आहे. अन्यथा मनसेच्या स्टाईलने तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा थेट इशारा त्यांनी प्रशासनाला दिला आहे.



दरेकर यांनी प्रसिद्धीस दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, आधीच आर्थिक संकटात सापडलेल्या शेतकरी आणि सामान्य जनतेवर स्मार्ट मीटरची सक्ती करून सरकार आणि महावितरण जनतेच्या जखमेवर मीठ चोळण्याचे काम करत आहेत. स्मार्ट मीटरमुळे वीजबिले अव्वाच्या सव्वा येण्याची भीती असून, नागरिकांमध्ये मोठी अस्वस्थता निर्माण झाली आहे.

''स्मार्ट मीटरच्या नावाखाली जनतेची लूट''

कैलास दरेकर यांनी सरकारच्या धोरणावर जोरदार टीका करत, स्मार्ट मीटरच्या माध्यमातून गरीब व सर्वसामान्य जनतेची आर्थिक लूट सुरू असल्याचा आरोप केला. कोणतीही जनजागृती न करता आणि नागरिकांना विश्वासात न घेता ही योजना सक्तीने राबवली जात असल्याने जनतेमध्ये तीव्र संतापाची भावना निर्माण झाली असल्याचे त्यांनी म्हटले.

''शेती पंपावर स्मार्ट मीटर बसवू देणार नाही''

आष्टी तालुक्यातील कोणत्याही गावात किंवा शेतकरी पंपावर सक्तीने स्मार्ट मीटर बसविण्याचा प्रयत्न झाल्यास मनसे शेतकरी सेना तीव्र विरोध करेल, असा इशारा देत ही संपूर्ण प्रक्रिया तात्काळ थांबविण्याची मागणी दरेकर यांनी केली.

पान ३ वर

# फूल देत दिला निर्वाणीचा इशारा

## आता अतिक्रमण केल्यास थेट कायदेशीर कारवाई!

बीड । प्रतिनिधी

बीड शहरातील वाहतुकीस अडथळा ठरणाऱ्या अतिक्रमणांविरोधात जिल्हा वाहतूक शाखेने पुन्हा एकदा जनजागृतीचा मार्ग अवलंबत अतिक्रमणधारकांना फूल देऊन अतिक्रमण करू नका, अशी समज दिली. मात्र, यानंतरही नियमांचे उल्लंघन करून रस्ते, नाले, फूटपाथ अथवा सार्वजनिक जागांवर अतिक्रमण केल्यास कोणतीही दया न दाखवता कठोर



कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असा स्पष्ट इशारा वाहतूक शाखेने दिला आहे.

जिल्हा वाहतूक शाखेचे प्रभारी पोलीस निरीक्षक वैभव पाटील व पोलीस उपनिरीक्षक विजय जाधवर तसेच बीड नगरपालिकेचे उपमुख्य कार्यकारी अधिकारी सम्राट कदम व अतिक्रमण प्रमुख मुन्ना गायकवाड यांच्या संयुक्त विद्यमाने ही समज मोहीम राबविण्यात आली.

नागरिकांच्या सुरक्षिततेसाठी व वाहतूक सुरळीत ठेवण्यासाठी अतिक्रमण हटविणे आवश्यक असल्याचे पान ३ वर

# जिल्ह्यातील भेसळखोरांवर धाडी टाकून कारवाईचा वेग वाढवा - बालाजी इंगोले

बीड । प्रतिनिधी

अन्नपदार्थ व पेय पदार्थांमध्ये घातक घटकांची भेसळ करून नागरिकांच्या जीवाशी खेळण्याचा प्रकार जिल्ह्यात राजरोसपणे सुरू आहे. त्यामुळे अन्न व औषध प्रशासनाने अशा भेसळखोरांवर धाडी टाकून कठोर कारवाई करावी, अशी मागणी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे बीड जिल्हाध्यक्ष बालाजी इंगोले यांनी केली आहे.

बीड जिल्ह्यात भेसळखोरांचा धुमाकूळ सुरू असून, अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त म्हणून तुकाराम मुंडे यांची नियुक्ती झाल्यानंतरही जिल्ह्यात भेसळीचे प्रकार राजरोसपणे सुरूच आहेत. जिल्ह्यात बनावट खवा, बनावट मिठाई, बनावट पनीर, बनावट दूध तसेच खाद्यतेल यांची विक्री होत असून, वडापावसह विविध हॉटेल व खाद्यपदार्थांच्या व्यावसायिकांकडूनही भेसळीचे प्रकार सुरू आहेत. अनेक ठिकाणी बनावट मिठाई तयार करणारे कारखाने कार्यरत असल्याची माहिती समोर येत आहे.

मानवी शरीरासाठी अत्यंत घातक असलेल्या पदार्थांचा वापर होत असल्याने त्याचा थेट परिणाम लहान मुले तसेच सर्वसामान्य नागरिकांच्या आरोग्यावर होत आहे. या गंभीर प्रकाराची अन्न व औषध प्रशासनाने तातडीने दखल घेऊन संबंधितांवर कठोर कारवाई करावी, अशी मागणी अखिल भारतीय भ्रष्टाचार निर्मूलन संघर्ष समितीचे बीड जिल्हाध्यक्ष बालाजी इंगोले यांनी केली आहे. यासंदर्भात लवकरच अन्न व औषध प्रशासनाचे आयुक्त तुकाराम मुंडे यांना राष्ट्रीय अध्यक्ष प्रदीप पाटील खंडापूरकर व प्रदेश कार्याध्यक्ष विनोद (अप्पा) इंगोले यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्ह्याचे शिष्टमंडळ भेटून निवेदन देण्यात येणार आहे.

# डॉ. युवराज कोल्हे यांची एमपीएससी परीक्षेतून जिल्हा शल्यचिकित्सक पदासाठी निवड

माजलगाव । प्रतिनिधी

येथील यशवंत हॉस्पिटलमध्ये कार्यरत असलेले प्रख्यात शल्यचिकित्सक डॉ. युवराज कोल्हे यांची महाराष्ट्र लोकसेवा आयोगामार्फत (एमपीएससी) घेण्यात आलेल्या भरती प्रक्रियेत जिल्हा शल्यचिकित्सक वर्ग १ पदासाठी निवड झाली आहे. कठोर मेहनत, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर त्यांनी हे यश संपादन केल्याने वैद्यकीय क्षेत्रासह सर्व स्तरांतून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

डॉ. युवराज कोल्हे यांनी लातूर येथील शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातून एमबीबीएस पदवी



प्राप्त केली. त्यानंतर नवी दिल्ली येथील एनडीएमसी महाविद्यालयातून डीएनबी (सर्जरी) ही पदव्युत्तर पदवी पूर्ण केली. वैद्यकीय शिक्षणानंतर त्यांनी ग्रामीण रुग्णालयात शासकीय सेवा बजावत रुग्णसेवेचा समृद्ध अनुभव मिळवला. गेल्या नऊ वर्षांपासून ते पान ३ वर

# प्रमुख राज्य मार्ग क्र.१६ च्या सुधारणा कामासाठी ९६६ कोटींची मंजुरी

## मुख्यमंत्र्यांकडून हिरवा कंदील, आ. धस यांच्या पाठपुराव्याला यश

आष्टी । प्रतिनिधी

अहिल्यानगर ते बीड या प्रमुख राज्य मार्ग क्र.१६ च्या सुधारणा व रुंदीकरणासाठी राज्य शासनाने तब्बल ९६६ कोटी रुपयांच्या निधीला मंजुरी दिली आहे. आष्टी मतदारसंघाचे आमदार सुरेश धस यांनी केलेल्या सातत्यपूर्ण पाठपुराव्यामुळे अर्थसंकल्पीय अधिवेशनाच्या पहिल्याच दिवशी राज्य शासनाने या कामाला मंजुरी दिली असून हा महत्त्वाचा निर्णय घेण्यात आल्याची माहिती त्यांच्या आ.सुरेश धस यांचे स्वीय सहाय्यक नियोजन विभागाचे स्वीय सहाय्यक विनोद रोडे यांनी दिली.

अहिल्यानगर ते बीड दरम्यानचा सुमारे ९६ किलोमीटर लांबीचा हा प्रमुख राज्य मार्ग अनेक वर्षांपासून वळणावळणाचा व काही ठिकाणी अत्यंत धोकादायक बनला होता. त्यामुळे या मार्गावर वारंवार अपघात घडत होते. वाहनचालक, प्रवासी तसेच परिसरातील नागरिकांकडून या रस्त्याच्या सुधारणा व धोकादायक वळणांचे सरळीकरण करण्याची मागणी सातत्याने होत होती.

या पार्श्वभूमीवर आमदार सुरेश धस यांनी विविध स्तरांवर पाठपुरावा केला. विशेषतः म्हसोबाची वाडी येथे आयोजित





अखंड हरिनाम सप्ताहाच्या समारोप कार्यक्रमात उपस्थित असलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे त्यांनी या रस्त्याच्या सुधारणेची मागणी केली होती. त्यावेळी मुख्यमंत्र्यांनी या मागणीची दखल घेत रस्ता सुधारणा करण्याचे आश्वासन दिले होते.

राज्य शासनाने आता या आश्वासनाची पूर्तता करत टाकळी काझी ते बीड दरम्यान कि.मी. १३/१०० ते १०९/७०० या टप्प्यातील संपूर्ण रस्त्याच्या सुधारणा कामासाठी ९६६ कोटी रुपयांची मंजुरी दिली आहे. या कामामध्ये अनेक धोकादायक वळणांचे सरळीकरण, रस्त्याची गुणवत्ता वाढविणे तसेच वाहतुकीची सुरक्षितता सुनिश्चित करण्यावर भर दिला जाणार आहे.या मार्गावरील टाकळी काझी, दौलावडगाव, पिंपरी, घाटा, कारखेल खुर्द, म्हसोबाची वाडी फाटा, धामणगाव, डोईठाण, हातोला, अमळनेर, डोंगरकिन्ही, गारमाथा, निरगुडी आदी गावांतील नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत करत समाधान व्यक्त केले आहे. रस्त्याची सुधारणा झाल्यानंतर प्रवास अधिक सुरक्षित, जलद व सुलभ होणार असून अपघातांचे प्रमाणही लक्षणीयरीत्या कमी होईल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.दरम्यान, या महत्त्वाकांक्षी प्रकल्पासाठी निधी मंजूर केल्याबद्दल आमदार सुरेश धस यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार तसेच सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रराजे भोसले यांचे आभार मानले आहेत. हा प्रकल्प पूर्ण झाल्यानंतर अहिल्यानगर-बीड मार्गावरील वाहतुकीला नवी गती मिळणार असून परिसराच्या विकासालाही चालना मिळणार आहे.

# सुरेश धस समर्थकांचा जल्लोष, फटाक्यांची आतषबाजी

## बसवराज पाटील यांचा दणदणीत विजय

आष्टी । प्रतिनिधी

बीड-लातूर-धाराशिव स्थानिक स्वराज्य संस्था मतदारसंघाच्या विधान परिषद निवडणुकीत महायुतीचे उमेदवार बसवराज पाटील यांनी काँग्रेसचे उमेदवार महेश देशमुख यांचा मोठ्या मताधिक्याने पराभव करत दणदणीत विजय मिळविला. या विजयाचे प्रमुख शिल्पकार म्हणून भाजपचे आमदार तथा मराठवाड्यातील प्रभावी नेते सुरेश (आण्णा) धस यांचे नाव पुढे येत असून, त्यांच्या समर्थकांनी आष्टीत जल्लोष साजरा करत विजयाचा आनंदोत्सव साजरा केला.

निवडणुकीदरम्यान आमदार सुरेश धस यांनी बीड जिल्ह्यातील नगरपरिषद, नगरपंचायत सदस्यांसह विविध पदाधिकाऱ्यांच्या भेटीगाठी घेत महायुतीच्या उमेदवाराच्या विजयासाठी जोरदार फिल्डिंग लावली होती. त्याचा प्रत्यय निकालात दिसून आला असून महायुतीच्या बाजूने मोठ्या प्रमाणावर मतदान झाल्याने बसवराज पाटील यांनी विजयाची पताका फडकावली.

विजयाची घोषणा होताच आष्टी येथील सुरेश धस यांच्या संपर्क कार्यालयासमोर भाजप कार्यकर्त्यांनी एकच जल्लोष केला. फटाक्यांची आतषबाजी, गुलालाची उधळण, पेढे वाटप आणि जोरदार घोषणाबाजीने परिसर दणाणून गेला. भारतीय जनता पक्षाचा विजय असो,



देवेंद्रजी फडणवीसांचा विजय असो, एकनाथ शिंदे आगे बढो, हम तुम्हारे साथ हैं, सुरेश आण्णा तुम आगे बढो, हम तुम्हारे साथ हैं अशा घोषणांनी परिसर दुमदुमून गेला.यावेळी नगराध्यक्ष जिया बेग,उप नगराध्यक्ष शैलेश सहस्रबुद्धे, माजी नगराध्यक्ष रंगनाथ आण्णा धोंडे, भाजपचे आष्टी पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26